# भजन कोणाचे करावे?

एका परमात्म्याच्या भक्तिशिवाय जो कल्याणाची इच्छा करतो तो मूर्ख आहे.

परमेश्वराचे विराटस्वरूप अंतःकरणात पाहता येते. साधनेद्वारे ते शक्य आहे.

परमात्मा हेच सत्य आहे. ॐ चा जप करा.

अविनाशी सर्वज्ञ पदाची प्राप्ती केली आहे.

आत्मा हेच सत्य आहे आणि कठोर तपस्येद्वारा याच जन्मात त्याचे ज्ञान होऊ शकते.

## सर्व महापुरुषांचे मत सारखेच आहे

अहुरमज्दा-परमेश्वर हेच एकमेव सत्य आहे.

ॐकार हाच सदगुरुचा प्रसाद आहे.

एका अल्लाशिवाय कोणतेच सत्य नाही.

एकच परमेश्वर आहे. त्याचा आधार, त्याच्यावरच श्रद्धा आणि त्याचीच साधना.

तिन्ही काळांमध्ये सत्याचा अभाव नाही आणि असत्य गोष्टीचे अस्तित्व नाही
परमेश्वर हेच सत्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे
आता विचार करण्यासारखी बाब ही आहे की सत्य काय आहे?

कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके - गीता

॥ ॐ नमः सद्‌गुरुदेवाय ॥

# भजन कोणाचे करावे?

सत्याचा अभाव नाही
आणि त्याला नष्ट ही करता येत नाही
विचार फक्त एवढाच करायचा आहे की सत्य काय आहे ?


*लेखक :*
परमपूज्य श्री परमहंस महाराजांचा कृपाप्रसाद
**स्वामी अडगडानन्द**
**श्री परमहंस आश्रम शक्तिषगढ़,**
ग्राम पोस्ट - शक्तिषगढ़, जिला- मिर्जापुर
उत्तर प्रदेश, भारत
फोन: (०५४४३) २३८०४०



*प्रकाशक :*

**श्री परमहंस स्वामी अडगडानन्द जी आश्रम ट्रस्ट**

# शास्त्र

पूर्वी सर्व शास्त्रे मुखोद्‌गत होती. शिष्य परंपरेने ती कंठस्थ केली जात असत. ही शास्त्रे तेव्हा पुस्तकरूपाने अस्तित्वात नव्हती. पाच हजार वर्षांपूर्वी वेदव्यासांनी ही शास्त्रे प्रथम लिपीबद्ध केली. चार वेद, महाभारत, गीता इत्यादी महत्त्वपूर्ण ग्रंथांचे संकलन वेदव्यासांनीच केले आहे. भौतिक व आध्यात्मिक ज्ञानावरील ग्रंथही त्यांनीच लिहिले; परंतु त्यांना त्यांनी शास्त्र असे म्हटले नाही. त्यांनी वेदांनाही शास्त्र ही संज्ञा दिली नाही. परंतु गीतेबाबत त्यांनी म्हटले आहे की, गीता सुगीता कर्तव्या किमनै शास्त्र संग्रहै ! या स्वयं पदमनाभस्य मुख पद्‌माब्ज विनिःसृता ! भगवान पद्‌मनाभाच्या मुखारविंदातून उधृत झालेली वाणी म्हणजे गीता होय. तिचेच चांगल्या प्रकारे मनन व चिंतन करून हृदयात चांगली धारण करावी. आता अन्य शास्त्रांबाबत विचार करण्याचा किंवा त्यांचा संग्रह करण्याची काहीही आवश्यकता नाही. जगात अन्यत्र कुठे काही प्राप्त झाले असेल तर ते गीतेतूनच प्राप्त झाले आहे असे समजावे. 'एका इश्वराची लेकरे' हा विचार गीतेतूनच घेतला आहे. हा विचार चांगल्या प्रकारे जाणून घेण्यासाठी 'यर्थाथ गीता' हा ग्रंथ पाहावा.

अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू तसेच ममुक्षुजन अर्थ-धर्म-स्वर्गोपम सुख तसेच परमश्रेयाच्या प्राप्तीसाठी ' यर्थाथ गीता ' हा ग्रंथ पाहावा.

निवेदक – भक्तमंडळ
**श्री परमहंस आश्रम**
शक्तेषगढ, चुनार, मिर्जापूर (उ.प्र.)

# गुरु-वन्दना

**।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय ।।**

जय सद्गुरुदेवं, परमानन्दं, अमर शरीरं अविकारी।।
निर्गुण निर्मूलं, धरि स्थूलं, काटन शूलं भवभारी।।

सूरत निज सोहं, कलिमल खोहं, जनमन मोहन छविभारी।।
अमरापुर वासी, सब सुख राशी, सदा एकरस निर्विकारी।।


अनुभव गम्भीरा, मति के धीरा, अलख फकीरा अवतारी।।
योगी अद्वैष्टा, त्रिकाल द्रष्टा, केवल पद आनन्दकारी।।

चित्रकूटहिं आयो, अद्वैत लखायो, अनुसुइया आसन मारी।।
श्री परमहंस स्वामी, अन्तर्यामी, हैं बड़नामी संसारी।।

हंसन हितकारी, जग पगुधारी, गर्व प्रहारी उपकारी।।
सत्-पंथ चलायो, भरम मिटायो, रूप लखायो करतारी।।

यह शिष्य है तेरो, करत निहोरो, मोपर हेरो प्रणधारी।।
जय सद्गुरु.........भारी।।

।। ॐ ।।




श्री श्री १००८ श्री स्वामी परमानन्दजी महाराज ( परमहंसजी )
जन्मः शुभ सम्वत् विक्रम १९६९ ( १९११ ई. )
महाप्रयाण ज्येष्ठ शुक्ल ७, २०२६, दिनांक २३/०५/१९६९ ई.
परमहंस आश्रम अनुसुइया, चित्रकूट



श्री स्वामी अड़गड़ानन्द जी महाराज

# भजन कोणाचे करावे?

बंधूनो,

सागर-मंथनातून निघालेल्या अमृत-कुंभातील जल जेथे जेथे सांडले तेथे तेथे आज कुंभमेळे भरत असतात. त्या अमृत-तत्त्वाचे शास्त्रोक्त ज्ञान व्हावे, त्यामागील हेतू समजावा यासाठी कुंभमेळे भरत असतात. मेळ्यात निर्हेतूक सामील होण्यासाठी, तेथे स्नान करण्यासाठी किंवा तेथील दृश्य केवळ पहाण्यासाठी कुंभमेळे भरत नसतात. तर लोकांना खऱ्या धर्माबाबत, परमेश्वराबाबत व जीवनाच्या कल्याणप्रद मार्गाबाबत ज्ञान व्हावे व ततसंबंधीच्या भ्रामक कल्पना नष्ट व्हाव्यात यांसाठी कुंभमेळ्याचे आयोजन होत असते. मात्र सांप्रत लोक, गीता आणि अन्य योगाशास्त्रांनुसार सर्वत्र व्यापून असणाऱ्या एकमेव परमेश्वरप्राप्तीच्या सांगितलेल्या मार्गाचे अनुसरण न करता अन्य पूजाविधीचे व पूजापद्धतींचे अनुसरण करीत असतात. त्यामुळे कोणी गायीला धर्म समजतात, कोणी पिंपळाला धर्म समजतात; तर कोणी धर्मामध्ये वर्णाश्रम अत्यंत महत्त्वाचा घटक आहे असे समजतात. या भ्रांतीमुळे सनातन धर्म म्हणजे काय? हा प्रश्न अत्यंत जटील झाला आहे. आजही इष्ट किंवा **ईश्वर म्हणजे काय?** व **भजन कोणाचे करावे** हा प्रश्न असाच जटील बनला आहे. लोकांना अद्यापही त्याचे आकलन होत नाही.

वास्तविक जगात सर्वांत अधिक धार्मिक वृत्तीचा, भजन-चिंतन करणारा व पूजापाठादि विधी करणारा हिंदू मनुष्यच असतो. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, जीवनाच्या अंतीम घटकेपर्यंत हा अत्यंत श्रध्दाशील मनुष्य आपला इष्टदेव कोण याचा निर्णय करू शकत नाही. कोणाची पूजा केल्याने कल्याणप्रद मार्ग प्राप्त होईल हे शेवटपर्यंत त्याला समजत नाही. असे होण्याचे मुख्य कारण म्हणजे बहुईश्वरवादाचा प्रचार हेच होय. अहो, एखाद्या कुटुंबात दहा लोक असतील तर त्या प्रत्येकाचा देव वेगळा वेगळा असतो. कोणी हनुमानाचा भक्त असतो, तर कोणी शंकराचा, कोणी देवीचा; तर कोणी अन्य देवतेचा! इतकेच नव्हे तर आपापल्या देवी-देवतांवरून लोक आपापसात भांडत असलेलेही दिसून येते. मात्र शाश्वत तत्त्व कोणते आहे? कोणाची उपासना केल्याने शाश्वतधामाची प्राप्ती होते हे माहीत नसते. अनेक देव-देवतांचा आमच्या मनावर इतका जबरदस्त पगडा असतो की अंतीम घटकेपर्यंत आम्ही त्यांपैकी एकावरही श्रध्दा टिकवून धरू शकत नाही. मृत्युशय्येवर असताना आजूबाजूला असणारा आमचा परिवार म्हणतो की, दादा आता देवाचे नाव घ्या. सर्व चिंता सोडून एका ईश्वराचे

स्मरण करा. तेव्हा दादा एका झटक्यात स्मरण सुरू करतात- हे शिव शंकरा, हे श्रीरामा, हे विठ्ठला पांडुरंगा, हे दत्तात्रया, हे मारुतिराया, हे दुर्गे, हे शीतला माते, हे विंध्यवासिनी देवी, हे तुळजाभवानी, हे अंबामातें, हे शिरडीच्या साईबाबा... अशा प्रकारे पंचवीस-तीस देवतांची नावे घेतात. अशी ही भ्रांती शेवटपर्यंत संपत नाही. मग ''एक मंदिर दस देवता क्यों कर बसे बजार?'' हृदय एक मंदिर आहे. त्यात आम्ही एकाच देवतेची स्थापना करू शकतो. अनेक देवतांचा बाजार तेथे भरवू शकत नाही. ''दुविधामे दोऊ गये, माया मिली न राम'' द्विधा वृत्तीने आम्ही सर्वच गमावून बसतो. शेवटी रामही हातात राहत नाही. तेव्हा हृदयरूपी देशात, कोणा एकाचीच प्रतिष्ठापना करणेच उचित होइल.

या, आपण पाहूया की या संदर्भात आपल्या पूर्व महापुरुषांनी, काय सांगितले आहे? भगवान श्रीकृष्णांनी कोणाला इष्ट म्हटले आहे? भगवान श्रीरामांनी कोणाचे भजन करण्यास सांगितले आहे? भगवान शिवशंकरानी कोणाचे स्मरण करावयास सांगितले आहे? या आप्तपुरुषांनी स्वत: कोणाचे चिंतन केले? ही साधी गोष्ट जर आम्ही जाणून घेतली व त्याप्रमाणे ती स्वीकारली तर सर्व संदेह नष्ट होईल व पुढेही कधी तो निर्माण होणार नाही. दु:ख याच गोष्टीचे आहे की आपण त्यावर विचारच करत नाही. कदाचित विचार येतही असेल; पण या देवतांविषयीचे भय आमच्या मनात ठाण मांडून बसले आहे. आम्हांला वाटते आमचे जुने उपास्य देव आमच्यावर रूष्ट तर होणार नाहीत ना? त्यामुळे आम्ही आमचे जुने निर्णय बदलण्यास धजावत नाही. आम्हांला वाटते असे केल्याने आमच्या जुन्या देवता आम्हांला दु:ख देतील.

या विषयावर योगेश्वर श्रीकृष्णांनी गीतेमध्ये आपला विचार स्पष्टपणे मांडला आहे.- पाहा-

**मामुपेत्य पुनर्जन्म दु:खालयशाश्वतम्।**
**नाष्पुवन्ति महात्मान: संसध्दिं परमां गता:।८/१५**

अर्जुना, मजप्रत आल्यानंतर, दु:खाची खाण असलेला, दु:खाचे आगर असणारा व क्षणभंगुर असा पुनर्जन्म त्याला प्राप्त होत नाही. उलट तो भक्त मजप्रत येतो. ज्याला पुनर्जन्म प्राप्त होतो तो दु:खाच्या खाईत पडतो. मला प्राप्त करून घेतल्यानंतर मात्र त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही; उलट 'स्थानम प्राप्स्यसि शाश्वतम' शाश्वत असे जे परमधाम ते त्याला प्राप्त होते. हा पुनर्जन्म कोणाकोणाला प्राप्त होतो ते आता पाहा.-

**आब्रहनभुवनातल्लोका: पुनरावर्तिनोऽर्जुन।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्येते।।गीता ८/१६**

अर्जुना, ब्रह्मलोकासकट सर्व चौदा भुवने- चराचर जगत पुनर्जन्म पावणारे आहे. परंतु मजप्रत आल्यानंतर मात्र त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही. उलट त्याला शाश्वतधामाची प्राप्ती होते. यावरून स्पष्टपणे दिसून येते की, ब्रह्मदेव आणि त्यांनी निर्माण केलेली सर्व सृष्टी ही नश्वर आहे- क्षणभंगुर आहे. या सृष्टीमध्ये देवता, पितृलोक, दानव, ऋषी, सूर्य, चंद्र या सर्वांचा समावेश होतो. मानवजीवनाचे परम लक्ष्य आहे- अमरत्वाची प्राप्ती! श्रीकृष्णांच्या म्हणण्याप्रमाणे ही अमरत्वाची प्राप्ती फक्त एका परमात्म्याच्या चिंतनानेच होत असते. उदाहरणार्थ- आपल्याला समुद्र पार करावयाचा आहे. तो अथांग समुद्र पार करण्यासाठी जर तुम्ही कागदाच्या होडीचा सहारा घेतलात तर थोडेसे अंतर कापताच ती नाव नष्ट होईल व त्याबरोबर तुम्हीही बुडून जाल. अशा प्रकारे कोणतेही साधन जे तकलादू आहे, स्वत: नष्ट होणारे आहे त्याच्या सहाय्याने पैलतीरी जाण्याची आशा करणे म्हणजे निराशाच पदरात घेण्यासारखी आहे. याप्रकारे जे साधन स्वत: तकलादू आहे, नश्वर आहे ते तुम्हाला शाश्वतधाम देऊ शकणार नाही, ते तुम्हाला अमरत्व देऊ शकणार नाही. हो! ते तुम्हाला मरण मात्र अवश्य देऊ शकेल. तेव्हा एका परमेश्वराचे एकचित होऊन चिंतन करा असा गीतेचा उपदेश आहे.

गीतेनुसार जर देवता अशाश्वत व दु:खाचे आगर आहेत तर मग त्यांची पूजा का केली जाते? यावर श्रीकृष्णांनी सांगितले आहे (अध्याय-७)- अर्जुना, ज्यांची बुध्दी अनेक कामनांनी ग्रस्त आहे असे मूढबुध्दी लोकच अन्य देवतांची पूजा करीत असतात. तेथे देवता नावाची कोणी समर्थ वस्तू किंवा तत्त्व असतच नाही. उलट पाणी, दगड, वृक्ष किंवा जेथे व ज्यावर मनुष्याची श्रध्दा बसेल तेथे मीच स्वत: उभा राहतो व त्यांच्या श्रध्देला पुष्टी देतो. पूजणाऱ्याला त्याच्या भक्तीप्रमाणे फळ देतो. परंतु ते फळ भोगल्याबरोबर नष्ट होते. म्हणजे फळ मिळवण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम तर केले; परंतु एवढे करून जे फळ मिळविले ते नष्ट झाले सारांश, सर्व परिश्रम वाया गेले.

पण अल्पबुध्दी लोकांना वाटते भले नंतर फळ नष्ट झाले; पण थोडे दिवस तरी ते फळ भोगता येते ना! मग त्यात काय वाईट आहे? यावर नवव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात की, या नश्वर देवतांना पूजणारे खरोखर माझीच पूजा करीत असतात, परंतु ते पूजन अविधीपूर्वक असल्याने नष्ट होत असते. वास्तविक अत्यंत परिश्रम घेऊन, अनेक गोष्टींचा त्याग करून, रक्त आटवून पूजा करायची व त्याचा परिणाम काय होतो? तर मिळालेले फळ नष्ट होते. कारण तुमचे पूजन अविधीपूर्वक असते. मग श्रम जर करायचेच आहेत तर ते विधीपूर्वक का करू नयेत? मार्ग आक्रमायचाच आहे; मग खरा मार्गच का पकडू नये?

जर पूजापध्दती अविधीपूर्वक आहे तर मग विधीपूर्वक पूजन कोणते? यावर अठराव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात की, अर्जुना, आपल्या स्वभावाच्या क्षमतेनुसार नियत कर्म करणारा मनुष्य कशा प्रकारे भगवत्प्राप्तिरूप परमसिध्दी प्राप्त करून घेऊ शकतो तो विधी तू माझ्याकडून ऐक. ज्या परमात्म्यापासून सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ती झाली आहे, जो संपूर्ण जगतात व्यापून राहिलेला आहे त्या परमेश्वराची उपासना आपल्या स्वभावधर्मानुसार- क्षमतेनुसार करून परमेश्वराला संतुष्ट केल्याने मनुष्याला परमसिध्दी प्राप्त होत असते. म्हणजे परमेश्वराचे पूजन हाच विधी आहे. हे पूजन म्हणजे चिंतनाची एक निर्धारित क्रिया आहे. यामध्ये श्वासाचे यजन, इंद्रियांचा संयम, यज्ञस्वरूप महापुरुषाचे ध्यान इत्यादी  क्रियांचा समावेश होतो. याची चर्चा भगवान श्रीकृष्णांनी चौथ्या अध्यायातील यज्ञाच्या प्रकरणामध्ये तसेच गीतेमध्ये ठिकठिकाणी केली आहे. 'सनातन धर्म' या प्रकरणात आपणही ते सविस्तर वाचू शकता.

तुम्ही केवळ एका परमेश्वरावर श्रध्दा ठेवून त्याच्या कोणत्याही नावाचा- ओम् किंवा रामाचा जर श्रध्देने जप केलात तरी (धर्म न जाणताही) तुम्ही शुध्द धार्मिक आहात. संपूर्ण क्रिया जाणत नसतानाही क्रियावान आहात. व यापासून प्राप्त होणारे फळ ना नष्ट होते ना तुम्ही!

संपूर्ण गीतेमध्ये योगेश्वर श्रीकृष्णांनी कधीही देवतांचे समर्थन केलेले नाही. नवव्या अध्यायात ते म्हणतात की काही लोक माझी पूजा करून स्वर्गाची अभिलाषा करतात. मी त्यांना स्वर्गलोकीचे वैभव भोगण्यास देतो; परंतु- 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' त्यांचे पुण्य क्षीण झाले, संपत आले की, ते पुन्हा खाली येतात, परंतु खाली पडल्यानंतरही त्यांचा नाश होत नाही. कारण ते नेहमी विहित कर्मच करीत असतात. व हाच खरा विधी आहे. अर्जुना, या विहित कर्मामध्ये आरंभाचा नाश होत नाही. यामध्ये साधकाची कोणतीही इच्छा भगवान पूर्ण करतात. इच्छा-भोग हे शाश्वत नसतात ते भोगून संपतात. पण त्या भक्ताचा विनाश होत नाही. कारण तो विधीपूर्वक भगवंताचे पूजन करतो. वास्तविक ब्रह्मापासून उत्पन्न झालेले ब्रह्मलोक, देवलोक, पशु-पक्षी-कीटक-पतंगादि सर्व लोक म्हणजे केवळ भोग योनी आहेत. केवळ मनुष्यच कर्म करू शकतो. या कर्माद्वारे तो परमेश्वरास प्राप्त करू शकतो. मोक्ष मिळवू शकतो. शरीरधारणेच्या बाबतीत आपण देवतांपेक्षाही भाग्यवान आहोत. कारण हे शरीर प्राप्त होणे अत्यंत दुर्लभ असते व ते आपल्याला प्राप्त झाले आहे. आपण त्यापासून कोणती अपेक्षा करतो? तुम्हाला देव बनायचे असेल तर बनू शकता, ब्रह्माची स्थिती प्राप्त करून घ्यायची असेल तर ती प्राप्त करून घेऊ शकता. परंतु जोपर्यंत मनाचा निरोध व विलय यांच्याबरोबर परमेश्वराचा

साक्षात्कार करून त्या परमभावामध्ये जोपर्यंत मन स्थित होत नाही तोपर्यंत मनुष्याचा पुनर्जन्म टळत नाही. तेव्हा गीतेने सांगितलेले विहित कर्म करीत भगवंताचे पूजन करणे हाच खरा विधी होय.

सोळाव्या अध्यायात शेवटी भगवन म्हणतात अर्जुना, तू शास्त्रद्वारा निर्धारित असणारे कर्म कर. पण कोणते शास्त्र? त्या शास्त्राच्या शोधासाठी अन्यत्र भटकण्याची आवश्यकता नाही ''किमन्यैः शास्त्र विस्तरैः'' अन्य शास्त्रांचा शोध करण्याची काय आवश्यकता? भगवान श्रीकृष्णांनी स्वयं सांगितले आहे- ''इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ''- (गीता १५/२०) अर्जुना, हे अत्यंत गुह्यतम असे शास्त्र मी तुला सांगितले आहे. पुढच्याच श्लोकात ते म्हणतात की, आपणास करण्यास योग्य काय, अयोग्य काय हे आपल्या बुध्दीने ठरवून चालणार नाही. त्याचा निर्णय शास्त्राच्या दृष्टीनेच केला पाहिजे. म्हणून तू शास्त्रद्वारा जे नियत कर्म आहे ते तू कर. जो शास्त्रविधी डावलून आपल्या इच्छेनुसार वागतो त्याला ना कधी सुख प्राप्त होते ना ही परम गती, ना लोक प्राप्त होतो, ना परलोक, म्हणून आपण सर्वांनी शास्त्रद्वारा प्रमाणित असे जे कर्म त्याचे आचरण करावे. भूतादि व इतर देवतादिंची पूजा करीत आपण आपला हा लोक व परलोक बिघडवू नये.

यावर अर्जुनाने विचारले जे लोक शास्त्र विधींचा त्याग करतात, परंतु परमात्म्याला अत्यंत श्रध्देने भजतात त्यांना कोणती गती प्राप्त होते? यावर भगवन् म्हणाले की अर्जुना, हा पुरुष श्रध्दामय आहे. कोठे ना कोठे त्याची श्रध्दा ही असतेच. अशा या श्रध्दावानांची श्रध्दा तीन प्रकारची असते. सात्त्विक, राजस व तामस. सात्त्विक श्रध्दावान देवतांची पूजा करतात, राजस श्रध्दावान यक्ष-राक्षसांचे पूजन करतात व तामसी श्रध्दावान लोक भूत-प्रेतांची पूजा करतात. हे तीन प्रकारचे श्रध्दाशील लोक केवळ पूजनच करतात असे नाही तर त्यासाठी अथक परिश्रम घेतात, घोर तपाचे आचरण करतात; परंतु अर्जुना, या तीन प्रकारचे श्रध्दाशील लोक शरीररूपात स्थित असणाऱ्या भूत समुदायास आणि अंत:करण स्थित मला अंतर्यामी परमात्म्याला क्षीण करणारे असतात. मला ते भजत नाहीत तर माझ्यापासून दूर जातात. अर्जुना, या सर्वांना तू असुर समज. अर्थात्, देवी-देवतांना पूजणारे सर्व असुर आहेत असे तू जाण.

असुरचा अर्थ काय? दोन शिंगांचा, मोठ्या-मोठ्या दातांचा कोणी भेसूर-विचित्र जीव? नाही तो असुर नव्हे परमदेव परमात्म्याच्या देवत्वापासून जे वंचित राहतात त्यांना असुर म्हटले जाते. श्रीकृष्णाच्या मतानुसार जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक देवतांप्रमाणे असणारे व दुसरे असुरांप्रमाणे असणारे असतात. दैवी संपदेचे गुण असणारे

देवतांप्रमाणे असतात व आसुरी संपदेचे गुण असणारे म्हणजे दुर्गुण धारण करणारे पुरुष असुरी वृत्तीचे असतात. आपला एक सख्खा भाऊ दैवी संपदेचा असू शकतो तर दुसरा आसुरी वृत्तीचा असू शकतो. योगेश्वर म्हणतात की, या वृत्तीच्या सर्वांना तू असुर समज.

बंधूंनो, तुम्ही इतके श्रम केलेत, शास्त्रविधींना डावलून एवढे तप केले. पण उपयोग काय झाला! परिणाम काय झाला? की त्या परमत्म्याच्या देवत्त्वापासून वंचितच राहिलात? 'असुरजान' असुर बनलात. ज्या आत्म्याला परमात्म्याला प्रसन्न करावयाचे होते ते अधिक दुर्बल झाले आणि परमात्म्यापासून अधिक दूर गेले. तेव्हा श्रम करावयाचेच असतील तर अशा पद्धतीने करा की ज्यायोगे परमात्मा प्रतिकूल न होता अनुकूल होईल. तेव्हा मग शास्त्रविधींना नियत असणारे कर्मच का करू नये? देव-देवता ज्या एका परमात्म्याचा अंशमात्र आहेत त्या परमात्म्याचे भजन करा. यावर श्रीकृष्णांनी सतत भर दिला आहे. परमात्म्याचे चिंतन हा गीतेचा मूळ उपदेश आहे.

पण असे चिंतन कोण करू शकेल? आम्ही तर खूप पापी आहोत. अर्जुनासारखे आमचे भाग्य कुठले? असा समज करून घेऊ नका. असे हताश होऊ नका.- कारण योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात- हे अर्जुना,

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः । ९/३० (गीता)**

अत्यंत दुराचारी पुरुषदेखील जर अन्य देवतांची उपासना न करता अनन्य भावाने केवळ माझीच उपासना करेल तर त्यालादेखील साधुत्व प्राप्त होईल. कारण त्याचा निश्चय यथार्थ आहे. **'क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति'** या प्रकारे एकाग्र चित्ताने परमात्म्याचे चिंतन करणारा धर्मात्मा बनतो. परमधर्म परमात्म्यासारखे त्याचे अंतःकरण बनते व त्याला शाश्वत शांती प्राप्त होते.

तेव्हा तुम्ही अगदी दुराचारी असलात किंवा दुराचाऱ्यांचा मुकुटमणी किंवा शिरोमणी असलात तरी जर ईश्वराप्रती अढळ श्रध्दा असेल व परमात्म्याच्या प्राप्तीसाठी तुम्ही शास्त्रविधींनी युक्त असे पूजन करीत असाल, नियत कर्म करीत श्रध्दायुक्त अंतःकरणाने ईश्वराचे भजन करीत असाल तर तुम्ही लवकरच धर्मात्मा बनाल **''कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति''**- अर्जुना, माझा भक्त कधीही नष्ट होत नाही हे सत्य तूं निश्चितपणे जाण. येथे अन्य कोणत्याही देवतेचे पूजन केले जात नाही.

ठीक आहे, एकमेव असणाऱ्या परमात्म्याच्या ठिकाणी तुमची श्रध्दा स्थिर झाली, धर्माचरणासाठी तयारही झालात परंतु त्या एकमेव असणाऱ्या परमेश्वराला शोधायचे

कोठे? तीर्थक्षेत्री की मंदिरात? त्या ईश्वराचे भजन करायचे ते कोठे? यावर अठराव्या अध्यायातील एकविसाव्या श्लोकात श्रीकृष्ण म्हणतात-

**ईश्वर: सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।गीता १८/६१**

अर्जुना, अरे तो ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात वसत असतो. मग तो इतका जवळ आहे तर दिसत का नाही? त्यावर ते म्हणतात की मायारूपी यंत्रावर आरूढ होऊन सर्व लोक भ्रमवश झालेले आहेत व त्यामुळे ते सर्वत्र वृथा भटकत आहेत. म्हणून त्यांना ईश्वर दिसत नाही. मग काय करावे? कोणाला शरण जावे?

गीतेतील १८/६२ व्या श्लोकात भगवान म्हणतात तमेव शरणं गच्छ- अर्जुना, त्या हृदयात स्थित असणाऱ्या परमेश्वराला शरण जा. 'सर्वभावेन' म्हणजे सर्व भावांसह त्याला शरण जा. अर्धा भाव देवीमध्ये, तर देवतांमध्ये असे करू नका. त्या ईश्वराला संपूर्ण हृदयासह समर्पित व्हा. स्वत:ला संपूर्णपणे त्याला अर्पण करा. यापासून काय लाभ होईल? तेव्हा ते म्हणतात, **'तत्प्रसादात्परां शान्ति, स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम'**- त्याच्या कृपा-प्रसादाने तुम्हांला परमशांती प्राप्त होईल. जे शाश्वत आहे, सदैव आहे असे स्थान तुम्हांला प्राप्त होईल. अशा प्रकारे परमेश्वराच्या प्राप्तीचे स्थळ हृदयात आहे बाहेर कोठेही नाही.

परंतु समस्या ही आहे की, हृदयस्थ ईश्वर आरंभी दिसून येत नाही. मग भक्ताने हृदयपूर्वक त्याला कसे शरण जावे? तेव्हा पुढच्या श्लोकात ते सांगतात- अर्जुना, अत्यंत गोपनीयाहून गोपनीय अशी एक गुह्य गोष्ट तुला सांगतो? कोणती?

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसिमे। गीता १८/६५**

हे अर्जुना, तू माझ्या ठिकाणी मन ठेवणारा हो म्हणजे सर्वांगानी तू माझ्याशीच मिळून राहा. तू माझा भक्त हो. माझ्या ठिकाणी तू परिपूर्ण श्रध्दा ठेव. मला नमस्कार कर. मी जी सांगितलेली आहेत ती नियत कर्मेच तू कर. असे केल्याने तू माझ्याप्रतच येशील.

प्रथम सांगितले होते तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जा. आता सांगतात ईश्वर हृदयदेशात आहे त्याला शरण जा म्हणजे तुला शाश्वत स्थान प्राप्त होईल. आणि येथे सांगतात मला शरण या- माझ्या आश्रयाला या. याचे कारण म्हणजे योगेश्वर श्रीकृष्ण आणि भगवान एकदुसऱ्यांना पूरक आहेत. त्यामुळे शाश्वत धाम प्राप्त करणे किंवा जे

परमात्म भावामध्ये स्थित आहेत अशा सद्गुरुला प्राप्त करणे दोन्ही एकच आहे. त्यामुळे सद्गुरुला शरण जाणे अत्यंत आवश्यक आहे. परमेश्वराच्या दरबारात प्रवेश देणारी चावी म्हणजे सद्गुरू होय. परमेश्वराचे अस्तित्व आहे, पण सद्गुरूच्या अभावामुळे त्याचे दर्शन व त्याच्या ठिकाणी प्रवेशाला विलंब होतो. श्रीकृष्ण एक योगेश्वर होते, सद्गुरू होते. ही गोष्ट आम्ही सहजपणे स्वीकारू शकत नाही. म्हणून योगेश्वर श्रीकृष्ण पुन्हा निश्चयपूर्वक सांगत आहेत-

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**

**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।गीता १८/६६**

अर्जुना, सर्व धर्मांचा त्याग करून मला एकट्यालाच तू शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करेन मी प्रतिज्ञेवर तुला सांगतो की, निश्चितपणे तू माझ्या स्वरूपाला प्राप्त करशील. तेव्हा शोक करू नकोस. खेद करू नकोस.

प्रत्येक महापुरुषाने हेच सांगितले. भगवान राम म्हणतात- 'भगति मोरि'। गौतम बुध्द असेच म्हणतात- ''बुध्द शरणं गच्छामि ।'' जैन म्हणतात- 'सम्यक् दर्शन ज्ञान चरित्राणि'- तीर्थंकरांचे दर्शन, त्यांनी सांगितलेले ज्ञान आणि त्यांच्याप्रमाणे चरित्र घडवणे हेच मोक्षाचे साधन आहे. शीख धर्मगुरू म्हणतात 'वाहे गुरू'. इस्लाम धर्म म्हणतो - महंमद पैगंबर अल्लाचे दूत आहेत. येशू ख्रिस्त म्हणतात- 'संसाराच्या भाराने खचून गेलेल्या माझ्या मुलांनो, तुम्ही माझ्याजवळ या मी तुम्हाला आराम देईन''. पूज्य महाराजश्री म्हणतात, ''अरे, आम्ही भगवंताचे दूत आहोत. मला भेटल्याशिवाय कोणी ईश्वराला भेटू शकत नाही.'' म्हणजे सर्वजण तुम्हांला बोलवत आहेत. तुम्ही कोणाकोणाजवळ जाल? महापुरुषांच्या या सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, आपल्या समकालीन अशा तत्त्ववेत्त्याला तुम्ही शरण जा.

म्हणजे तुम्ही स्वत:ला परमेश्वराच्या ठिकाणी समर्पित करा आणि ज्याला ईश्वराचा साक्षात्कार झाला आहे अशा महापुरुषाच्या सान्निध्यात राहा, त्याची सेवा करा. नंतर दोन-तीन अक्षरांचे ईश्वराचे कोणतेही नाव निवडा जसे 'राम' किंवा 'ॐ' व त्याचा निर्विकार मनाने जप करा. मात्र एकदा 'राम' एकदा 'ॐ' असा सारखा फेरबदल करू नका. कोणतेही एकच नाव पसंत करा. जर तुम्ही मराठी जाणत नसाल तर अणुरेणूमध्ये भरलेल्या ईश्वराचा वाचक असा दोन-तीन अक्षरांचा कोणताही शब्द निवडा व त्याचा जप करा. जेव्हा तुम्ही नामाच्या सूक्ष्म पातळीवर पोहचाल तेव्हा हे छोटे नाव तुमच्या श्वासात मिसळून जाईल.

## श्री रामचरित मानसच्या मते इष्ट कोणाला म्हणायचे?

आता आपण रामचरित मानसाच्या विचाररूपी प्रकाशात विचार करू त्याच्या मते इष्ट कोण आहे? भजन कोणाचे करावे? 'मानस' ज्यांच्या हृदयाची निर्मिती आहे ते भगवान शंकर म्हणतात-

**धर्म परायण सोइ कुल ताता। राम चरन जा कर मन राता ॥**
**नीति निपुन सोई परम सयाना। श्रुति सिध्दान्त नीक तेहिं जाना**
**सो कुल धन्य उमा सुनु, जगत पूज्य सुपुनीत।**
**श्री रघुवीर परायन, जेहिं नर उपज विनीत॥ उत्तरकांड-११६**

ज्याचे मन एकमात्र रामचरणी अनुरक्त आहे तोच खरा धर्मपरायण आहे, तोच नीतीनिपुण आहे, तोच खरा विद्वान आहे, त्यानेच वेदांचे सार चांगल्या प्रकारे जाणले आहे; असे समजावे.

संपूर्ण रामायणामध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत आम्ही भजन कोणाचे करावे ही गोष्ट पुन:पुन्हा जोर देऊन सांगितलेली आहे. श्रीरामाच्या वनवास कालातील प्रसंग आहे- भगवान राम शृंगवेरपूरमध्ये झोपले होते. दर्भ आरिण पानांपासून बनवलेल्या शय्येवर झोपलेल्या श्रीरामांना पाहून निषादराज गुहला फार दु:ख झाले. तो जवळ बसलेल्या लक्ष्मणाला म्हणाला, ''रघुनंदन राम आणि जानकीच्या सुखाच्या क्षणी त्यांना दु:खात लोटणारी कैकयी फार कुटिल स्त्री आहे''. यावर लक्ष्मण म्हणाला- छे छे! असे नाही.

**काहु न कोउ सुख दु:ख कर दाता। निजकृत करम भोग सब भ्राता॥**
**जोग-वियोग भोग भल-मंदा। हित-अनहित-मध्यम भ्रम फंदा॥**
**धरनि-धाम-धन-पुर-परिवारु। सरगु-नरक जहँ लगि व्यवहारु॥**
**देखिय सुनिय गुनिय मन माहीं। मोह मूल परमाथु नाहीं॥**

सुख-दु:ख कोणी कोणासाठी निर्माण करीत नाहीत. ते तर प्रत्येकाला त्याच्या कर्माप्रमाणे वाट्याला येत असते. ही धरणी, धाम, धन, परिवार, जन्म-मृत्यू, संपत्ती-विपत्ती, स्वर्ग-नरक या सर्व विषयांबाबत काही बोलणे, ऐकणे किंवा त्याबाबत विचार करणे हे मोहमूलक आहे. लोक स्वर्गाची इच्छा करतात तेही मोहमूलकच आहे. येथे परमार्थाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. मग खरा परमार्थ कोणता? परमार्थ म्हणजे केवळ एका परम पुरुषाचे- परमात्म्याचे चिंतन होय.

**सखा परम परमारथ एहू। मन क्रम वचन राम पद नेहू।।**

या प्रकरणात सांगितले आहे की स्वर्ग आणि नरकाचा विचार करणेसुध्दा मोहमूलक आहे. मोहाचा तो उद्गम आहे. आणि तुम्ही या स्वर्गाच्या अधिपती असणाऱ्या देवतांचे पूजन मोहापासून मुक्त होण्यासाठी करीत आहात? किती विसंगत आहे हे?

**(क)**

**हम देवता परम अधिकारी। विषय वस्य तव भगति बिसारी।।**

आम्ही देवता पूर्वी श्रेष्ठ अधिकारास पात्र होतो; पण आम्ही विषयांच्या आधीन झालो आणि भक्तीलाच विसरून गेलो. 'विषय वस्य सुर नर मुनि स्वामी' सुर, नर आणि मुनी हे विषयांच्या आधीन आहेत. देवतादेखील विषयांच्या आधीन आहेत. म्हणजे आपण देवतांची सेवा करतो याचा अर्थ आपण विषयांची सेवा करीत असतो.

**(ख)**

**विधिप्रपंच गुन-अवगुन साना।**
**दानव देव ऊँच अरू नीचू। अमिय सुजीवन माहुर मीचू।।**
**सरग-नरक अनुराग-विरागा। निगमागम गुन-दोष विभागा।।**

विधात्याचा प्रपंच गुण आणि अवगुणांनी भरलेला आहे. प्रपंच म्हणजे काय? पाप आणि पुण्य, उच्च व नीच जाती, सुंदर अमृतमय व विषमय जीवन, जीवन व मृत्यू, स्वर्ग आणि नरक हे सर्व म्हणजे विधात्याचा प्रपंच आहे. संतुष्टचित्त असणाऱ्या महापुरुषांनी याचेच विभाजन केले होते. जर आपण देवतांची पूजा करीत असाल तर याचा अर्थ आपण प्रपंचाची पूजा करीत आहात व तो प्रपंच म्हणजे या संसारातील गुण-दोषांचे चित्रण आहे. देवता किंवा स्वर्ग म्हणजेही या संसाराचाच एक भाग आहे.

**(ग)**

एकदा पक्षिराज गरुडाला मोह झाला-त्याला चित्तभ्रम झाला तो ब्रह्माकडे गेला. ब्रह्मदेव मनात म्हणाले या गरुडाला तर मीच बनवले आहे. अरे, पण भगवंताच्या मायेने खुद्द मला अनेकदा नाचवले आहे. तेथे या पक्षिराज गरुडाने मोहवश व्हावे यात आश्चर्य ते काय?- 'विपुल बार जेहि मोह नचावा।' जेथे देवतांचे पितामह ब्रह्मदेवदेखील भगवंताच्या मायेने वश होऊन नाचू लागतात, मग ज्यांचे पूजन करायला तुम्ही धावता त्या देवता मोहमायेपासून तुम्हांला काय वाचवणार?

**सोई प्रभु भ्रू विलास खगराजा।**
**नाच नटी इव सहित समाजा।।**

तीच माया मात्र भगवंताच्या इशाऱ्यावर नाचत असते. आणि आपण मायेला वश होऊन नाचणाऱ्यांची पूजा करीत असतो. तेव्हा जर पूजा करायचीच असेल तर, ज्याच्या इशाऱ्यावर प्रत्यक्ष माया नाचते त्या भगवंताची पूजा करा. गरुडराजा म्हणतात की मी अगदी प्रतिज्ञापूर्वक सांगत आहे की, माया ही रघुवीराची दासी आहे आणि ती त्यांच्या कृपेशिवाय सुटत नाही. तेव्हा जो या मायेचा अधिपती आहे, स्वामी आहे त्या परमात्म्याचे भजन करा. रामचरित मानसमध्ये वारंवार ह्याच गोष्टीवर भर देऊन सांगितले आहे.

**(घ)**

**अग-जग जीव नाग नर देवा। नाथ सकल जग काल कलेवा।।**

देवता व मनुष्यादी चराचर जगत म्हणजे काळाची न्याहारी आहे. देवतादेखील काळाची न्याहारीच आहेत, काळाच्या चहापाण्याची ती सामग्री आहे. मग आता पाहा. आपण कोणाचे भजन करता? काळाच्या या न्याहारीचे? का? **'भजसि न मन तेहि राम कहै, काल जासु को दण्डा।'** 'भुवनेश्वर कालहु कर काला।' काळाचेपण काळ व या चराचर जगताचे स्वामी असणाऱ्या भगवान श्रीरामाचे भजन का करीत नाही? जो स्वयं मरणारा आहे, तो आपल्याला मृत्यू प्रदान करु शकतो. मृत्यूपासून आपल्याला वाचवू शकत नाही. मग त्याचे भजन करण्यात काय अर्थ?

**(ङ)**

इतकेच नव्हे तर देवता आपले मनोगत जाणण्याइतपत देखील सक्षम नसतात. एकदा देवर्षी नारद हिमालयातील एका गुहेमध्ये तपस्यारत होते. देवतांचा राजा इंद्र याला वाटले की माझे इंद्र-पद हिरावून घेण्यासाठी नारद ही घोर तपस्या करीत आहे. अरे देवतांचा राजा जो इंद्र त्याला एवढेही समजू नये की, नारद कशासाठी भजन करीत आहेत? अशा या देवता तुमची मनोकामना काय पूर्ण करणार?

**(च)**

लक्षात ठेवा की, या देवताच भगवतमार्गातील अवरोध आहेत. त्या केवळ नारदालाच नव्हे तर जे जे भजनामध्ये अग्रिम झाले-श्रेष्ठ झाले त्या सर्वांना तेथून खाली ढकलण्याचा खूप प्रयत्न केला आहे. ते सामान्य मनुष्यालासुध्दा या मार्गावर जाऊ देत नाहीत.

**इन्द्रिय द्वार झरोखा नाना। तहँ तहँ सुर बैठे करि थाना।।**
**आवत देखहि विषय बयारी। ते हठि देहिं कपाट उघारी।।**

हृदयरूपी घराला इंद्रियरूपी अनेक खिडक्या आहेत. त्या प्रत्येक खिडकीवर देवतांनी आपला अड्डा बनवला आहे. विषयरूपी हवेला आलेले पाहताच या देवता हृदयरूपी घराच्या खिडक्या उघडून त्या हवेला आत घेतात. ती हवा लागताच मनुष्याला विषयाची गुंगी चढते. इंद्रिये आणि त्यांच्या देवतांना ज्ञान बिलकूल आवडत नाही. त्यांच्याशी तर आपल्याला लढायचे आहे. त्या म्हणजेच विकार आहेत. भगवत् मार्गातील अवरोध आहेत. जर तुम्ही देवतांची पूजा करीत असाल तर तुम्ही विकारांची पूजा करीत आहात, अवरोधाची पूजा करीत आहात.

**विषय करन सुर जीव समेत। सकल एक से एक सचेता।।**
**सबकर परम प्रकाशक जोई। राम अनादि अवधपति सोई।।**

विषय, इंद्रिये, त्यांच्या देवता आणि जीवात्मा (चढत्या क्रमात) हे सर्व परस्परांच्या सहाय्याने क्रियाशील आहेत आणि या सर्वांच्या वर परम प्रकाशक, अनादि अवधपति असा राम स्थित आहे. या परम प्रकाशक श्रीरामाचा प्रकाश घेऊनच सर्व देवता प्रकाशित होत असतात. तेव्हा त्या मूळ परमात्म्याचे तुम्ही चिंतन करा.

**(छ)**

या देवता त्रिकालज्ञ नाहीत. राम-रावणाचे युध्दाचीच गोष्ट घ्या- भयंकर युध्द सुरू होते. देवता नुसत्या पाहत होत्या. रावण मरणारच होता ते निश्चित होते. पण तरीही देवता कोणाचाही पक्ष घेत नव्हत्या कारण जय निश्चित कोणाचा होईल ते सांगता येत नव्हते. त्या 'विकल बोलहि जय जये'- जय हो, जय हो असा नुसता जयजयकार करीत होत्या. कारण कोण जिंकेल ते माहीत नव्हते. रामाचा जय असो- असे म्हणण्यात धोका होता. जेव्हा रामाचा विजय होणार हे निश्चित झाले तेव्हाच देवराज इंद्राने आपला रथ रामाच्या सहाय्यासाठी पाठवला. आणि जेव्हा रावण मेला तेव्हा लगेच तेथे स्वार्थी देवता पोहचल्या, त्यांचे पितामह देखील तेथे पोहचले आणि म्हणू लागले-

**कृतकृत्य विभो सब वानर ए। निरखंति तवानन सादर ए।।**
**धिग जीवन देव सरीर हरे। तव भक्ति बिना भव भूलि पर।।**

हे प्रभो, आपल्या मुखारविन्दाचे दर्शन करणारे हे वानर कृतकृत्य आहेत. जे आपली भक्ती न करता या भवसागरात डुंबत आहोत त्या आम्हा देवतांच्या शरीराचा धिक्कार असो. अरे ज्या देवता स्वत:च चुकीच्या रस्त्यावर चालत आहेत त्या आपल्याला काय रस्ता दाखवणार? देवता म्हणतात-

**भव प्रवाह संतत हम परे। अब प्रभु पाहि सरन अनुसरे।।**

ज्या स्वत: प्रवाहपतीत आहेत त्या आपल्याला काय भवपार करणार? त्यांना भवपार होणे माहीत असते तर स्वत: भवपार झाल्या नसत्या का? ज्या भवसागरातून स्वत:ला वाचवण्यासाठी त्राही त्राही करीत आहेत त्या तुम्हाला काय पार करणार? हो तुमच्या खांद्यावर बसून कदाचित त्या भवपार होतील. मग तुम्ही कुठल्या किनाऱ्याला पोहचाल? तेव्हा देवताही ज्यांना शरण जातात आपण सरळ त्या भगवंतालाच शरण जा त्याचाच आश्रय घ्या. ज्या देवता स्वत: विपत्तीमध्ये सापडल्या आहेत त्या तुमची काय सहाय्यता करणार?

**(ज)**

गोस्वामी तुलसीदास यांनी देवतांचे समर्थन कोठेही केले नाही. 'माया विवश बिचारे' (विनय पत्रिका) ज्या देवता विवश आहेत, बिचाऱ्या आहेत, ज्यांच्याजवळ दुसरा काही मार्गच नाही अशा देवतांकडे तुम्ही का जाता? अरे देवता म्हणजे आपला इष्टदेव नव्हे हे नीट लक्षात ठेवा.

**(झ)**

देवतांचा पराक्रम कोणता व किती? गोस्वामी तुलसीदासांनी आपल्या रामचरित मानसमध्ये ठिकठिकाणी ते सांगितले आहे.

**रावण आवत सुनेऊ सकोहा। देवन्ह तकेऊ मेरू गिरि खोहा।।**

रावण क्रुध्द होऊन येत आहे असे देवांनी नुसते ऐकले, अरे लढण्याचा विचार तर दूरच पण नुसते त्यांनी ऐकले की क्रोधित होऊन येत आहे तर 'देवन्ह तकेऊ मेरू गिरि खोहा'- मेरू पर्वताच्या गुहांमध्ये ते जाऊन लपले. पण देव किती धावणार? रावणांने त्यांना पुष्पक विमानात बसवले व घेऊन गेला.

**देव यक्ष गंधर्व नर किन्नर नाग कुमारि।**
**जीति बरी निज बाहुबल बहु सुन्दर वर नारि।।**

देव, यक्ष, गंधर्व, किन्नर व नाग सुंदरीनां जिंकले, त्यांचे वरण करून त्यांना निशाचरांत वितरित केले व देवलोकामध्ये जे सुखोपभोग होते ते त्यांना मिळावे अशी व्यवस्था केली. जेव्हा देवांना कळले की आपल्या सर्वांचा परिवार रावणाकडे बंदिवान आहे तेव्हा आता एकटे किती दिवस व कसे जगायचे? तेव्हा आपल्या परिवाराला सोडवण्यासाठी ते सर्वजण लंकेला गेले. तेव्हा रावणाने त्यांना सेवक बनवून कामाला

लावले. **कर जोरे सब दिसिप विनीता। भृकुटि विलोकहिं सकल सभीता।। बिचारे देवगण!** सर्वजण हात जोडून नम्रपणे उभे राहत असत. आपल्या उठण्या-बसण्यात काही चूक होऊ नये, आदेश-पालनात वेळ लागू नये, रावणाने नाराज होऊ नये यासाठी ते रावणाच्या भृकुटीकडे सतत लक्ष ठेवून असत.

**रवि ससि पवन वरून धनधारी।**
**अगिनी काल जन सब अधिकारी।।**

सूर्य, चंद्रमा, अग्नी, यमराज, कुबेर आणि देवतांचे सर्व अधिकारी रावणाच्या आज्ञेचे पालन करीत असत. ते अत्यंत भयभीत झालेले होते. त्यामुळे ते रोज रावणाच्या चरणी नमन करीत असत, प्रतिदिनी त्याच्या सेवेत तत्परतेने उपस्थित राहत. जो वेळेवर पोहोचू शकत नव्हता तो घरुनच प्रार्थना करून निघत असे की रावणाने कोणती तक्रार करू नये किंवा रावणाची भ्रूकुटी चढू नये. अशी देवतांची अवस्था! तरीही आम्ही त्यांची पूजा करतो.

**(ञ)**

आता या प्रकरणात जे जे देवतांचे सहाय्य मागायला गेले त्यांच्याबाबतीत काय झाले ते पाहू. देवतांनी त्यांना कशी मदत केली? एकदा निशाचरांच्या त्रासाला कंटाळून गाईचे रूप घेऊन पृथ्वी देवगणांकडे गेली. ती त्यांना म्हणाली तुम्ही माझे रक्षण करा. देवतागण म्हणाले की आम्ही तुझे रक्षण करण्यास असमर्थ आहोत. पृथ्वीबरोबर सुर, मुनी, गंधर्व हे सर्व देवतांचे पितामह जे ब्रह्मदेव त्यांच्याकडे गेले. ते का आले आहेत ते ब्रह्मदेवाने मनात जाणले म्हणाले मी तरी काय करणार? मीही अगदी विवश आहे. तेव्हा ते पृथ्वीला म्हणाले- ज्याची तू दासी आहेस, ज्याचा कधी नाश होत नाही म्हणजेच जो अविनाशी, जो अजरामर, शाश्वत आणि अमृतस्वरूप आहे त्या परमात्म्याची प्रार्थना करा. तो परमात्माच आम्हा सर्वांचा सहाय्यकर्ता आहे.

परंतु प्रश्न हा होता की, परमेश्वराला शोधायचे कोठे? ‘‘**पुर वैकुण्ठ जान कह कोई। कोई कह पयनिधी बस प्रभु सोई।**’’ कोणी परमात्मा वैकुंठात राहतो तेव्हा तिकडे चल असे म्हणत होते. तर कोणी म्हणत होते की, परमात्मा क्षीर-सागरात राहत असतो तेव्हा तिकडे जाऊ. या सर्व देवतांमध्ये भगवान शंकरही होते. पण त्यांना कोणी बोलायला संधीच देईनात. ‘‘अवसर पाइ वचन एक कहेऊँ’’ संधी मिळताच ते म्हणाले-

**हरि व्यापक सर्वत्र समाना।**
**प्रेम ते प्रकट होहिं मैं जाना।।**

**अग जग मय सब रहित विरागी।**
**प्रेम ते प्रभु प्रगटइ जिमि आगी॥**

भगवान शंकरांनी त्यांना माहित असणारा उपाय सांगितला की, भगवान कणाकणामध्ये भरलेला आहे. मनाचा संपूर्ण संयम करून हृदयपूर्वक त्याला शरण जा तो लगेच प्रकट होईल. भगवान शंकरांचे मत सर्वांना पटले. ब्रह्मदेवाने देखील दुजोरा दिला. त्या विधीनुसार भगवंताचे स्मरण केल्याबरोबर आकाशवाणी झाली की, तुम्हा लोकांचे सर्व दु:ख मी दूर करेन.

या समस्त प्रकरणामध्ये देवतांनी कोणता निर्णय दिला आणि कोणती मदत केली? ज्यांना भगवंताचे चिंतन कसे करावे हे माहीत नाही त्या देवता तुम्हाला कोणते मार्गदर्शन करणार? ज्यांना परमकल्याणाचा मार्ग माहीत नाही ते तुमचे कसले रक्षण करणार, ते तुमचे कसले कल्याण करणार?

तरीदेखील आम्ही त्याचाच पाठलाग करतो. केवढी ही मूर्खता! याचे मूळ कारण काय? यामध्ये कोणाचा दोष आहे? यात आमचा दोष आहे का? नाही यात आमचा पण दोष नाही. कारण ही रुढी ही मूर्खता आम्हांला वारसा हक्काने मिळत असते. कारण लहानपणापासून मूल आपल्या मातांना, शेजार-पाजाऱ्यांना, घरातील इतर मंडळींना काही ना काही पूजा-पाठ करीत असलेले पाहते. मुलाच्या ते मनावर बिंबते. त्याची छाप त्या मुलाच्या मनावर पडते. त्यामुळे नंतर अनेकदा समजावूनसुध्दा त्यांना ते पटत नाही. साधारणत: अनेक ठिकाणी स्त्रिया आपल्या मुलांना पिंपळ, वड, औदुंबरसारख्या झाडांना देव समजून त्या झाडाची पूजा करायला लावतात, त्या झाडाखाली बसवतात, धूपारती करवतात. तर कधी कुठल्या साधूला किंवा कुठल्या बाबाला नमस्कार करायला सांगतात. कधी गावातल्या एखाद्या देवाला ग्रामदेवता आहे त्याला नमस्कार कर म्हणून सांगतात. लहानपणी झालेले हे संस्कार मुलाचा पिच्छा सोडत नाहीत. त्यामुळे लहानपणापासूनच ते मूल भयभीत झालेले असते. आणि जे मूल लहानपणी भयभीत झालेले असते ते मरेपर्यंत तसेच भयभीत राहते. अंधारात किंवा एखाद्या एकांत जागी ते मूल जायला घाबरते. रात्रीच्या वेळी झाडाच्या सळसळणाऱ्या पानांची देखील त्याला भीती वाटते. या प्रकारे लहानपणापासूनच त्याच्या मनावर पगडा बसतो. मोठे झाल्यावर कदाचित तो त्या देव-देवतांचा त्यागही करतो; पण मन मात्र शंकेखोरच राहते. तेव्हा सर्व माता-पित्यांना माझी अशी नम्र विनंती आहे की, आपण आपल्या मुलाचे भविष्य अंधकारमय बनवू नका.

## (ट)

सीतेलादेखील अशा देव देवतांची पूजा वारसा हक्काने मिळालेली होती- ''गिरिजा पूजन जननि पठाई'' सीता गिरजेची पूजा करायला रोज तेथे जात असे. स्वयंवराचे आयोजन चालले होते. एक दिवस पार्वतीची पूजा करून सीता परत येत होती. त्या वाटिकेतून परत येत असताना तिची दृष्टी वाटिकेत बसलेल्या श्रीरामावर पडली. दृष्टी तेथेच खिळून राहिली. वास्तविक सीता पार्वतीची पूजा करून परतत होती. पण ती पुन्हा पार्वतीच्या मंदिरात धावत गेली. हात जोडून म्हणाली ''माते, मी आजपर्यंत तुझी खूप सेवा केली आहे. तेव्हा त्या सेवेला स्मरून मला आता वाटिकेत ज्याचे दर्शन झाले ती सावळी मूर्ती मला वर म्हणून देण्याची कृपा कर.''

पार्वतीने काही आशीर्वाद दिला नाही. पण तिला आवाज आला- **''नारद वचन सदा सुचि साँचा। सो वर मिलिहिं जाहि मन राचा।'** तुमचे गुरू महर्षी नारद यांनी तुला वर दिलेला आहे की ज्याच्यावर तुझे मन बसेल तो वर तुला मिळेल तेव्हा त्यांचे वचन सत्य आहे- ते निर्दोष आहे. ते खोटे पडणार नाही. पार्वतीने नारदाच्या या वराचे तिला स्मरण करून दिले. सीता निश्चित झाली.

स्वयंवराच्या ठिकाणी, धनुष्य-यज्ञाच्या ठिकाणी ती पोहचली तेव्हा तिला दिसले की त्या धनुष्यावर बाण चढवण्यासाठी दहा हजार राजे आले होते. श्रीरामापेक्षा बलदंड! कसोटी सुरू झाली. पण ते दहा हजार राजे धनुष्यावर बाण चढवण्यात असफल झाले. सीतेच्या मनात आले की एवढ्या बलदंड राजांना जमले नाही ते या सुकुमाराला जमेल का? सीतेच्या मनात शंकाकुल भय निर्माण झाले.

**तब रामहि विलोकि वैदेही। सभय हृदय विनवत जेहि तेही।।**

तेव्हा ज्या ज्या देवांची तिला आठवण झाली त्या देवतेचे ती स्मरण करू लागली- **''होहु प्रसन्न महेश भवानी''**- भगवान शंकराची प्रार्थना करू लागली. पुन्हा ते स्मरण सोडून भवानीची प्रार्थना करू लागली. पण जिच्याकडे वरदान मागितले होते तिच्या ठिकाणीपण तिचे मन स्थिर होईना. ती गणनायकाकडे वळली.- **''गननायक वरदायक देवा। आज लगि कीन्हिउ तव सेवा।**- आजपर्यंत आपली पुष्कळ सेवा मी केली आहे तेव्हा परमेश्वरा, तू माझ्यासाठी धाव. माझ्या विनंतीला मान देऊन धनुष्य हलके कर. नंतर त्यालाही सोडले व **''सुर मनाव धरि धीर''**- अशा प्रकारे इतर देवतांना ती विनवू लागली. धनुष्याचीसुध्दा ती प्रार्थना करू लागली की माझी प्रार्थना दुसरे कोणी ऐकत नाही निदान आता तू तरी ऐक आता मला तुझाच भरोसा

आहे. तेव्हा आता तू स्वत:च हलका हो. परंतु आतापासूनच हलका होऊ नकोस नाहीतर दुसरा कोणी प्रत्यंचा लावेल. श्रीरामाला बघून मगच हलका हो.

कुठेही यश येत नाही पाहून सीतेने मनातील इतर सर्व देव-देवतांचा नाद सोडला व एका परमात्म्यावर तिने आपली श्रद्धा दृढ केली. तो परमात्मा की जो सर्वांच्या हृदयात स्थित असतो.

**तन मन वचन मोर पनु साँचा।**
**रघुपति पद सरोज चितु राचा।।**
**तौ भगवान सकल उरवासी।**
**करिहिं मोहि रघुवर कै दासी।।**

मनसा-वाचा-कर्मणा माझे प्रेम जर खरे असेल, जर ते रामचरणीच स्थिर झालेले असेल तर हे भगवन, मला दासी बनव. हृदयात एकमेव परमात्म्यावर श्रध्दा स्थिर होताच ''कृपा निधान राम सब जाना''- त्या अंतर्यामी भगवंताने जाणले की ही आता खऱ्या मार्गाने पूजा करीत आहे. त्यानंतर मनाचे समाधान झालेल्या सीतेला अन्य देवी-देवतांकडे जावे लागले नाही- ''तेहि छन राम मध्य धनु तोरा।'' कारण मग श्रीरामानेच ते धनुष्य तोडले. सीतेला यश प्राप्त झाले. तात्पर्य हेच की, आम्हाला वारसा हक्कानी जरी अनेक देव देवतांची उपासना, पूजाविधी प्राप्त झालेली असली तरी जेव्हा परम परमात्म्याच्या ठिकाणी आमची बुध्दी स्थिर होईल तेव्हाच आम्हाला यश प्राप्त होईल.

**(ठ)**

अशाच प्रकारची पूजा माता कौसल्याने केली होती. रामाला राज्याभिषेक होणार आहे हे ऐकून ती आनंदविभोर झाली व पूजागृहात गेली. **''पूजी ग्राम देवी सुर नागा। कहेउ बहोरि देन बलि भागा।''** तिने ग्राम देवता, इतर देवता आणि नागदेवांची वैभवपूर्ण पूजा केली. माझे काम सफल झाले, सिध्दीस गेले तर मी बळी चढवेन असेही तिने त्या सर्व देवतांना सांगितले.

अजूनपर्यंत देवतांना रामाच्या राज्याभिषेकाची सूचना नव्हती परंतु ग्रामदेवींना माता कौसल्येकडून समजले तेव्हा त्यांनी देवतांना सांगितले आणि देवतांनी इंद्रदेवांना सूचना दिली. ते त्वरित सरस्वतीकडे गेले.

**सारद बोलि विनय सुर करहीं। बारहिं बार पायँ लै परहीं।।**
**विपति हमार बिलोकि बड़ मातु करिय सोइ आनु।**

**राम जाहिं बन राजु तजि, होइ सफल सुर काजु॥**

हे माते, आम्ही फार संकटात आहोत. आपण असा काही चमत्कार करा की, ज्यायोगे राम वनात जातील व देवतांचे काम होईल. वास्तविक आपली मनोकामना सफल होण्यासाठी प्रार्थना केली होती माता कौसल्याने पण येथे देवता सांगत होत्या की कौसल्या राम-सीता हे सर्व कर्माधीन आहेत. त्यांना त्यांच्या कर्म फलावर सोडून द्या व तुम्ही प्रथम आम्हा देवतांचे हित पाहा.

माता सरस्वती म्हणाली, 'अरे शुभ कार्यात विघ्न उभे करायला तुम्हाला काही लाज वाटत नाही का? राम वनात गेल्यावर त्या मातेला किती कष्ट होतील? त्या पित्याचे काय होईल? अयोध्या अनाथ होईल. लोक मला काय म्हणतील? तरीदेखील देवता आपला हट्ट सोडेनात. त्या पुनःपुन्हा विनवीत राहिल्या- **''जीव करम वश सुखदुख भागी। जाइय अवध देव हित लागी॥''** अयोध्येच्या लोकांची चिंता तुम्ही कशाला करत आहात? ते तर जीव आहेत. त्यांच्या कर्माप्रमाणे ते सुखदुःख भोगत असतात तेव्हा ते भोगायला त्यांना त्यांच्या कर्मावर सोडून द्या. आणि देवतांच्या हितासाठी (कौसल्येच्या हितासाठी नाही) कौसलपूरला चला. वास्तविक देवतांची पूजा माता कौसल्याने केली होती. अशा प्रकारच्या देवतांपासून तुम्ही कोणती आशा बाळगाल? त्यांची पूजा करून तुम्हाला काय प्राप्त होणार? त्यापेक्षा गोस्वामींनी ज्याच्यावर भर दिला आहे व ज्याचे नाव 'भेटत कठिन कुअंक भाल के' आहे, ज्याची आराधना केल्याने कर्मबंधन नष्ट होते त्या भगवंताची पूजा तुम्ही का करीत नाही?

देवतांनी विनंती केल्यावरही माता सरस्वती त्यांच्या मनासारखे करण्यास बिचकत होती. तेव्हा पुनःपुन्हा तिचे चरण पकडून देवता तिची विनवणी करू लागल्या- **''बार बार गहि चरन संकोची। चली विचारि विबुध मति पोची॥** सरस्वती भांभावून गेली. तिच्या मनात सारखे येत होते की या देवता स्वर्गात राहत असूनही त्याची बुध्दी अशी खराब का असावी? किती वाईट वृत्तीच्या आहेत या देवता? त्यांचे वास्तव्य उच्च कोटीत (स्वर्गात) आहे; पण त्यांची करणी मात्र अगदी नीच कोटीची आहे. ते कोणाचे उच्च यश किंवा वृध्दी सहन करू शकत नाहीत. त्यांच्यामध्ये इर्ष्या व मत्सरबुध्दी फार आहे. अशा या देवतांचा आदर्श कोणाला सांगावा? मग आता तुम्हीच सांगा की हे तुमचे आदर्श आहेत का?

**हरषि हृदय दशरथ पुर आई। जनु ग्रह दशा दुसह दुखदाई॥**

देवतांची माता सरस्वती अयोध्येला येत होती. अयोध्यावासीयांचे केवढे सौभाग्य। परंतु गोस्वामीजी म्हणतात, नाही, 'जनु ग्रह दशा दुसह दुखदाई' सरस्वती मातेचे आगमन

म्हणजे अयोध्येच्या लोकांसाठी संकटांचा डोंगर कोसळण्यासारखे होते. म्हणतात की शनी हा दुष्ट ग्रह आहे. तो साडेसात वर्षे मनुष्याला कष्ट देतो. पण येथे तर सरस्वती चौदा वर्षांची दुर्दशा घेऊन आली. स्वत:राम कल्याणस्वरूप होते. ती त्यांचे काय कल्याण करणार? ते तर स्वत: देवतांचेदेखील कल्याण करायला आले होते. पण येथे देवतांची पूजा केली होती माता कौसल्याने पण तिला तिचे काय फळ मिळाले? जीवनभर सहन करावे लागणारे दु:ख व वैधव्य!

**नाम मन्थरा मन्दमति, चेरि कैकई केरि।**
**अजस पेटारि ताहि करि, गई गिरा मति फेरि।।**

अयोध्येत मंथरा नावाची मंद बुध्दीची दासी होती. सरस्वतीने तिच्या मस्तकात प्रवेश केला आणि तिची बुध्दी विकृत करून ती निघून गेली. यावरून तुमच्या एक गोष्ट लक्षात येईल की, बुध्दिमान आणि विवेकी लोकांवर या देव-देवतांचा प्रभाव चालत नाही. केवळ मंद बुध्दीचे लोकच या देवी-देवतांपासून प्रभावित होतात.

देव देवतांचे चरित्र अशाच प्रकारे त्यावेळी पाहावयास मिळत असे. जेव्हा भरत श्रीरामाला घेऊन जाण्यासाठी आला तेव्हा त्यांची अशीच वृत्ती पाहावयास मिळते. येथेही राम व भरताचे मीलन होऊ नये म्हणून देवतांनी प्रयत्न केला. त्यांच्या कुत्सित चरित्राची पराकाष्ठा राम व भरत यांच्या भेटीतील संवादाचेवेळी मानसकारांनी पाहिली. व म्हणून ते म्हणतात- ‘‘**मधवा महा मलीन, मुए मारि मंगल चहत**’’ इंद्र किती दुष्ट बुध्दीचा आहे! आधीपासूनच दु:खी असणाऱ्या अयोध्या व जनकपूरच्या प्रजेला अधिक कष्ट देत आहे. मेलेल्याला मारून तो स्वत:चे मंगल करू इच्छित आहे.

**कपट कुचालि सींव सुरराजू। पर अकाज प्रिय आपन काजू।।**
**काक समान पाक रिपु रीती। छली मलीन कतहुँ न प्रतीती।।**

देवराज इंद्र म्हणजे कपट आणि दुष्ट आचारांची सीमा आहे. त्याला दुसऱ्यांची हानी आणि स्वत:चा लाभ या दोन गोष्टीच प्रिय आहेत. अशा देवतांपासून आपण कोणत्या लाभाची अपेक्षा करणार? राम व भरताच्या त्या हृदयस्पर्शी भेटीच्या वेळीपण देवतांनी तेथे आपले वाईट विचार, कपट आणि भय यांना पाठवले. यालाच त्यांची देवमाया म्हणतात. तुम्हांला घ्यायचे असतील तर हे गुण तुम्ही त्यांच्याकडून घेऊ शकता. या त्यांच्या मायेचे शिकार कोणकोण झाले?

**भरत जनकु मुनिजन सहित, साधु सचेत बिहाइ।**
**लागि देवमाया सबहि, यथा जोग जनु पाइ।।**

भरत, राजा जनक, मुनी, साधू, संत आणि इतर बुध्दिमान लोक सोडून इतर सर्वांवर ज्यांचा जसा बुध्दीचा स्तर त्याप्रमाणे मायेचा प्रभाव त्यांच्यावर पडला. तात्पर्य, मंदबुध्दी असणाऱ्यांवरच देवतांचा प्रभाव पडत असतो.

सरस्वती मंथरेच्या जवळ आली तर मंथरेला काय मिळाले? सरस्वतीच्या कृपेनेच (?) मंथरेची बुध्दी विकृत बनली. ती वायफळ गोष्टींचा विचार करू लागली. षडयंत्राचा तिला सूत्रधार बनावे लागले आणि शेवटी तिला लाथ खावी लागली.

**कूबरू टूटे फूट कपारू। दलित दसन मुख रुधिर प्रचारू।।**

तिला इतका लत्ताप्रहार खावा लागला की, तिची कंबर तुटली, कपाळ फुटले, दात तुटले, तोंडातून रक्त वाहू लागले. एवढ्यावरच तिची दुर्दशा संपली नाही तर तिच्या झिंज्या पकडून तिला फरफटत नेले. वास्तविक जिच्या गळ्यात सरस्वती बसली आहे तिचा उलट सन्मान व्हायला पाहिजे होता; परंतु ती अशी अभागी होती की, या प्रसंगानंतर संपूर्ण रामायणात तिचे कुठेही नावसुध्दा नाही. आणि आजपर्यंत कोणतीही माता आपल्या कन्येचे नाव 'मंथरा' ठेवण्याचे धाडस करीत नाही. मंथरा देवी-देवतांच्या पूजेत रममाण असणाऱ्या मंद बुध्दी लोकाची प्रतिनिधी आहे. मंथरेची ही गोष्ट सांगून गोस्वामी आपल्याला काय सांगू इच्छित आहेत? कोण पूजनीय आहे याचा कधी तुम्ही विचार केला आहे का?

## (ड)

रामचरित मानसमध्ये सरस्वतीचा प्रयोग तीन वेळा केला आहे. एक तर या मंथरेच्या घटनेमध्ये. दुसरा प्रसंग म्हणजे राम आणि भरताच्या भेटीमध्ये देवतांनी सरस्वतीची प्रार्थना करून भरताची बुध्दी विकृत करायला सांगितले तेव्हा. देवतांचा परिवार सुखी करण्यासाठी सरस्वतीने हे काम करावी अशी देवतांची इच्छा होती. परंतु यावेळी मात्र सरस्वती संतापली. म्हणाली की सहस्त्र नेत्र असूनही तुला मेरू पर्वत दिसत नाही का? भरताच्या अंत:करणात कोणता मेरू पर्वत उभा होता? ''**भरत हृदय सियराम निवासू। तहँ कि तिमिर जहँ तरनि प्रकासू।।**'' अरे जेथे सूर्य प्रकाश आहे तेथे अंधाराला थारा कोठून असणार? पण भरताच्या अंतरंगात कोणता प्रकाश आहे? भरताच्या हृदयात राम आणि सीतेचा निवासरूपी प्रकाश आहे. तेथे माझे कपट किंवा चातुर्याचा काही उपयोग होणार नाही. येथे अनेकांना अशी शंका येईल की येथे अंधकार म्हणजे काय? प्रकाश म्हणजे काय? तर अंधकार म्हणजे देवता! व प्रकाश म्हणजे एक परमात्मा! या ठिकाणी आणखी एक गोष्ट स्पष्ट होत आहे की, ज्याच्या हृदयात भगवंताचा निवास आहे, देवता त्याच्या केसालाही धक्का लावू शकत नाहीत. तेव्हा मनसा वाचा

कर्मणा तुम्ही एका परमात्म्याला समर्पित व्हा. जर तुम्ही हृदयपूर्वक पाहाल तर तुमच्या हृदयाचे स्वामी देखील तुम्हाला पाहतील. तुमच्या रक्षणाची जबाबदारी घेतील.

तिसऱ्या वेळेस सरस्वती आम्हाला कुंभकर्णाजवळ भेटते. त्याच्या उग्र तपस्येवर संतुष्ट होऊन ब्रह्मदेव त्याच्याजवळ वर देण्यासाठी गेले. ब्रह्मदेवाने विचार केला की, हा अगदी दुष्ट आहे. तो काहीही करेल. नुसते बसून जेवत बसला तरी हे जग उजाड बनवेल. तेव्हा **''सारद प्रेरि तासु मति फेरी। मागेसि नींद मास षट केरी।।''** त्यांनी सरस्वतीला बोलवून घेतले त्याची बुध्दी मंद केली- विकृत करून टाकली तेव्हा कुंभकर्णाने सहा महिन्यांची झोप मागून घेतली. येथे कुंभकर्णामध्ये सरस्वतीचा प्रवेश त्याच्या मृत्यूस कारण ठरला. देवतांच्या पूजानाने कोणाचे व कसले कल्याण होणार?

## (ढ)

वर्तमान काळात समस्त देवतांमध्ये तीन देव श्रेष्ठ समजले जातात- ब्रह्मा, विष्णु आणि महेश. महाराज मनू घर-दार सोडून नैमिषारण्यात तप करण्यासाठी गेले आणि चिंतनात मग्न झाले. त्यांचे कोणते लक्ष्य होते? कोणाचे उपासक होते? ते मनातल्या मनात विचार करीत होते- **''विष्णु विरंचि शंभु भगवाना उपजहिं जासु अंश ते नाना।।''** ज्या भगवंताच्या अंशमात्राने अनेक ब्रह्मा, विष्णू आणि शंकर निर्माण होतात. ''ऐसेऊ प्रभु सेवक वश अहई'', जो भगवंत भक्ताला मात्र वश असतो, जो भक्तासाठी नेहमी धाऊन येतो त्या भगवंताचे मी भजन करेन. जो भगवंत माझी अभिलाषा पूर्ण करेल. असा विचार करून मनू चिंतनात मग्न झाले. साधनेला थोडा वेग आला. साधना जरा सुदृढ झाली तोच देवता तेथे पोहचल्या.

**विधि हरि हर तप देखि अपारा। मनु समीप आये बहुबारा।।**
**माँगहु बर बहु भाँति लोभाए। परमधीर नहिं चलहिं चलाए।।**

ब्रह्मा, विष्णु आणि महेश तेथे पोहचले. मनूला प्रथमपासूनच यांचे आगमन होणार हे माहीत होते, नाही तर तेही भरकटले असते. त्यांना माहीत होते की हे ब्रह्मा, विष्णु, महेश म्हणजे भगवंताच्या अनेक अंशांपैकी एक अंशच आहेत. म्हणून मनूने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. 'आमचे अहोभाग्य म्हणून आपले मला दर्शन घडले' असेही त्यांना म्हटले नाही. परंतु हे देवच स्वत: इतके निगरगट्ट होते की स्वाभिमान सोडून पुन:पुन्हा मनूच्या जवळ जात होते. त्यांच्या ध्यान-धारणेत विघ्न आणणे हाच त्यांचा हेतू होता. मनूचे कल्याण करणे त्यांचा हेतू नव्हता, तो त्यांना काही देणार नव्हते. ते त्यांना प्रलोभन देत होते. 'बहु भाँति लुभाए'। लोभच मोहाची प्रबलधारा आहे. 'काम-क्रोध, लोभादि-मद,

प्रबल मोह के धारि' ही मोहाचीच सेना आहे. त्यामुळे मनूने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. आपल्या चिंतनातच निमग्न राहिले **"आस्थिमात्र होइ रहे सरीरा। तदपि मनाग मनहिं नहिं पीरा॥"** ते चिंतनात इतके निमग्न होते शरीरात हाडाचा नुसता सापळा मात्र राहिला; परंतु मनात लेशमात्रही पीडा नव्हती. ध्यान-चिंतन उत्तम प्रकारे सुरू होते.

भगवंतांनी पाहिले हा भक्त काया, वाचा, मने मला शरण आलेला आहे. त्याचे मन संपूर्णपणे माझ्या ठिकाणी रत आहे. तेव्हा त्यांनी आकाशवाणी केली की, वर माग त्यांनी मनूना वर मागायला सांगितले, तेव्हा मनूने मागितले-

**जो स्वरूप बस शिव मन माहीं। जेहि कारन मुनि जतन कराही॥**
**जो भुशुण्डि मन मानस हंसा। अगुन सगुन जेहि निगम प्रशंसा॥**
**देखहिं हम सो रूप भरि लोचन। कृपा करहु प्रनतरति मोचन॥**

मनू भगवान शंकराच्या दर्शनाने संतुष्ट नव्हते. ते पुन:पुन्हा मनुजवळ आलेही; परंतु मनूने त्यांच्याजवळ काही मागितले नाही. भगवान शंकर मूलतत्त्वात स्थित असणारे, तत्त्वस्वरूप महापुरुष होते. पूर्ण प्राप्ती त्यांना झालेली होती. पण केवळ त्यांचे दर्शन करून राहणे व पुढे मार्ग-क्रमण सोडून स्वस्थ राहणे त्यांना पटत नव्हते. भगवान शंकरांच्या हृदयात जी अनुभूती होती ती स्वत: प्रयत्न करून प्राप्त करणे हे मनूचे लक्ष्य होते. स्वत: आचरण करूनच ही अनुभूती प्राप्त होते हे मनू जाणत होते. एखाद्या पहेलवानाला केवळ नमस्कार करून पहेलवान होता येत नाही. किंवा वैद्याच्या किंवा डॉक्टराच्या केवळ दर्शनाने रोग नाहीसा होत नाही.

महात्मा गौतम बुध्ददेखील आपल्या शिष्यांना सांगत असत की, मी जो उपदेश दिला आहे त्यानुसार आचरण केलेत तर दूर राहूनही माझ्या समीप आहात. जर तुम्ही आचरण केले नाहीत तर माझ्याजवळ राहून किंवा रोज माझे दर्शन घेऊन काही उपयोग नाही. उलट जवळ असूनही खूप दूर राहाल. यासाठी आचरण करा.

शंकर सच्चे आहेत ही गोष्ट मनूला माहीत होती. तरीदेखील मनूने त्यांच्याकडे काही मागितले नाही. पण जेव्हा भगवंतानी आकाशवाणी करून वर मागायला सांगितले तेव्हा शंकराच्या हृदयात जी अनुभूती होती, जे मूल तत्त्व स्थित होते तेच मागितले 'जेहि कारन मुनि जतन कराही'- की ज्यासाठी मुनी प्रयत्न करीत असतात. पण आजकालचे मुनी असे राहिले नाहीत. त्यांच्या अंगात कधी भवानी येते कधी मारुती येतो. हे सर्व खरे मुनी नाहीत. जे सच्चे मुनी असतात ते त्या परमतत्त्व परमात्म्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करीत असतात. पण सध्या हे मुनी बहकले आहेत.

मनूने इच्छा व्यक्त केल्यावर भगवान प्रकट झाले- 'विश्वास प्रकटे भगवान।' कोणता भगवान? ''हरि व्यापक सर्वत्र समाना''- जसे शिवशंकराने सांगितले होते, ''जेहि जाने जग जाई हेराई''- मनूने पाहिले की, विश्वात सर्वत्र म्हणजे जेथे जेथे जाल तेथे भगवंताचा वास आहे. दगड, पाणी... सर्व ठिकाणी, जेथे जेथे दृष्टि जाईल तेथे तेथे त्यामध्ये मनूला ईश्वर दिसू लागला. सारे जग ईश्वराने व्यापलेले पाहिल्यावर ते स्वत: हरवून गेले. विश्वाला पण हरवून बसले, मनू स्वत:चा जीव-संस्कारही हरवून बसले. जेथे त्यांना पूर्वी विश्व दिसत होते तेथे त्यांना सर्वत्र ईश्वर दिसू लागला.

**''ईशावास्यमिदं सर्वं यत् किंच जगत्याम् जगत्।''**

ही अवस्था ज्या ज्या महापुरुषांना प्राप्त झाली त्या सर्वांनी हेच म्हटले आहे की, जे दिसते, जे ऐकायला येते तेथे सर्वत्र ईश्वराचा वास आहे. तो सर्वत्र भरला असल्याचे अनुभवाला येते; पण आम्हाला तो प्रत्यक्ष दिसत मात्र नाही. याचे कारण काय असावे? **''जेहि जाने जग जाइ हेराई। जागे यथा स्वपन भ्रम जाई'' अस प्रभु अछत हृदय अविकारी'**. ईश्वर जरी सर्वत्र भरलेला दिसला तरी श्रीरामाचा वास खऱ्या भक्ताच्या हृदयात असतो तो बाहेर असत नाही. तुमच्या तो हृदयात आहे पण झोपलेला आहे- सुप्त आहे. त्याला जाणण्यासाठी परमात्म्यावर नितांत श्रध्दा पाहिजे आणि त्या परमात्म्याला आपल्या हृदयात जागृत करू शकेल अशा महापुरुषाचे सान्निध्य हवे आहे. लक्षात ठेवा की बाहेरच्या जगात ना कोणती देवी आहे ना कोणती देवता. बाहेरच्या वस्तू पुजून कधीही तुमचे कल्याण होणार नाही आणि ती वस्तूही प्राप्त होणार नाही- हेच रामायणाने सांगितले आहे.

## (ण)

जगातील कोट्यवधी देवता त्या परमतत्त्व परमात्म्याचा अंश आहे. कागभुशुण्डि म्हणतात- **''राम काम सतकोटि सुभग तन। दुर्गा कोटि अमित अरि मर्दन।''** परमेश्वर अब्जो कामदेवांप्रमाणे सुंदर आहे. कोट्यावदी पर्वततुल्य शत्रूंचा नाश करण्यास तो सक्षम आहे. 'शारद कोटि अमित चतुराई' अनंत कोटी सरस्वत्यांप्रमाणे तो चतुर आहे. ''विधि सतकोटी सृष्टि निपुनाई''- अब्जावधी ब्रह्मदेवांप्रमाणे सृष्टी रचनेमध्ये ते निपुण आहेत. ''विष्णु कोटिसम पालनकर्ता। रुद्र कोटिसत सम संहर्ता।।'' जगाचे पालन करण्यात कोट्यावधी विष्णूंप्रमाणे आहे व संहार करण्यात अब्जो रुद्रांप्रमाणे आहे. कोट्यावधी इंद्रांप्रमाणे त्याचे ऐश्वर्य आहे, अब्जावदी कुबेरांप्रमाणे तो धनवान आहे आणि अब्जावदी कामधेनूंप्रमाणे इच्छित वस्तू देण्यास तो सक्षम आहे. कोट्यावधी सूर्य त्याच्यापुढे काजव्याप्रमाणे आहेत. तरीदेखील आम्ही पूजा करतो त्या सूर्याची.

त्या प्रभूची नाही. तुम्ही त्या मुळालाच का पकडत नाही की हे सर्व त्याचे अंशमात्र आहेत. ''तुलसी मूलहि सेइये फूलइ फलइ अधाइ'' तुम्ही जर झाडाचे मूळ शोधाल, त्याची पूजा कराल तर फल, वृक्ष, पाने, फुले, फांद्या सर्व तुमचेच आहे. आणि पानांचे मागे धावाल म्हणजे पानांची पूजा करीत बसाल तर वृक्ष (मूळ परमात्मा) हातचा घालवून बसाल. निरनिराळ्या देवतांमध्ये, दगड, पाणी, पशू,पक्षी यांच्यामागे स्वत:चे कल्याण साधण्यासाठी तुमचा अमूल्य वेळ नष्ट करू नका. स्वत: आपला उध्दार करा.

## (त)

भरत देव-देवतांची पूजा करीत नसे; परंतु कोणत्याही कार्यारंभी शंकराची पूजा करीत असे. रामाच्या राज्यभिषेकापासून अयोध्येत जे षडयंत्र सुरू झाले तेव्हा भरत त्याच्या आजोळी होता. त्याला रात्री एकदा भयंकर स्वप्न पडले. मन नाना कुविचारांनी भरून गेले. त्याचे शमन व्हावे म्हणून **''विप्र जवाइ देहि दिन दाना। शिव अभिषेक करहि विधि नाना।।''** भरताने ब्राह्मण भोजने घातली. दाने दिली, अनेक प्रकारे शंकराला अभिषेक केले. **''माँगहि हृदय महेश मनाई। कुशल मातु पितु परिजन भाई।।''** आणि हृदयपूर्वक शंकराची प्रार्थना करीत होते की माझी आई, वडील, भाऊ आणि माझे सर्व कुटुंबीय या सर्वांना सुखी ठेव.

पण एवढी प्रार्थना करूनही काय प्राप्त झाले? पिताजी स्वर्गवासी झाले. आई विधवा झाली, भाऊ वनात गेले. सात दिवस म्हणजे भरत अयोध्येला पोहचेपर्यंत अयोध्येला कोणाच्या घरात चूल पेटली नव्हती. मग भगवान शंकराची पूजापण चुकीची आहे का? नाही. **''शिव सेवा कर फल सुत सोई। अविरल भगति राम पद होई।।''** आदिगुरू भगवान शंकराच्या सेवेचे एकमात्र फळ हे आहे की, उपासकाच्या मनात भगवान श्रीरामाविषयी उत्कट भक्ती निर्माण होते. भगवान शंकर त्यांच्या भक्तीने इतके संतुष्ट होत नाहीत. ते नेहमी रामाच्या भक्तीने अतीव संतुष्ट होतात. त्यामुळे भरताच्या मागण्यांकडे लक्ष न देता त्यांनी भरताला श्रीरामाचा अप्रतिम भक्त बनवला. शंकराचे जे कर्तव्य होते ते त्यांनी पूर्ण केले. यानंतर भरताने आजीवन रामाची अविरत भक्ती केली. त्यांनी पुन्हा शंकराची भक्ती केली नाही.

असेच उदाहरण कागभुशुण्डिजीचे आहे. मागील जन्मी ते भगवान शंकराचे अनन्य भक्त होते. बाकी कोणत्याही देवाला ते मानीत नव्हते. त्यांचे गुरू अत्यंत दयाळू होते. नीति-निपुण होते. ते नेहमी त्यांना सांगत की, भगवान शंकराच्या सेवेचे फळ म्हणजे भगवान श्रीरामाच्या चरणाची भक्ती हे आहे. तथापि त्यांचा हा उपदेश कागभुशुण्डिना आवडत नसे ते आपल्या गुरुदेवांची सतत अवहेलना करीत असत.

एक दिवस कागभुशुण्डि शिवजीच्या मंदिरात बसून शंकराचा जप करीत होते. तेव्हा तेथे त्यांचे गुरुदेव आले; पण कागभुशुण्डि उठून उभे राहिले नाहीत व त्यांना प्रणामही केला नाही. गुरुदेव अत्यंत दयाळू वृत्तीचे होते. त्यांनी या अपमानाकडे दुर्लक्ष केले; पण स्वयं श्रीशंकर भगवानांना गुरूचा हा अपमान सहन झाला नाही. त्यांनी रूष्ट होऊन त्यांना शाप दिला की तू अजगर बनशील व हजारो जन्म घेशील आणि मरशील. म्हणजे ज्या शंकराची ते भक्ती करीत होते ते शिव शंकरच त्यांच्यावर रुष्ट झाले. शेवटी गुरू महाराजांनाच दया आली त्यांनी भगवान शंकराची हृदयपूर्वक प्रार्थना करून आपल्या शिष्यावर अनुग्रह करण्याची प्रार्थना केली. शंकर त्यांच्या प्रार्थनेने संतुष्ट झाले. म्हणाले, त्याला जन्म तर घ्यावाच लागेल. परंतु जन्म आणि मृत्यूमधील असहनीय पीडा त्याला होणार नाही. कोणत्याही जन्मात त्याच्या पूर्व जन्मीचे ज्ञान नष्ट होणार नाही आणि शेवटी मनुष्य शरीर प्राप्त झाल्यावर तो रामाची भक्ती करेल.

म्हणजे कागभुशुण्डी शंकराचे भक्त होते परंतु शंकरांनी प्रसन्न होऊन त्यांना काय दिले? तर रामाची भक्ती. त्यांच्या शेवटच्या जन्माला त्यांना **''मन के सकल वासना भागी। केवल राम चरण लव लागी।।''** शिवसेवेचे फल काय मिळाले तर ''अविरल भक्ति राम पद होई'' रामचरणी त्यांचे ध्यान लागले व शेवटी त्या चरणाशीच समर्पित झाले.

## (थ)

आजही भारतात शिवपूजा रूढ आहे. भगवान शंकराची पुष्कळ मंदिरे येथे आहेत. जर तेथे सांगितले गेले की शिवजींनी कोणाची उपासना केली होती? त्यांची कोणती विद्या होती? त्यांनी कसे तप केले होते? त्यांनी काय संदेश दिला? आम्ही त्यांना कसे प्राप्त करून घेऊ शकतो?- तर ते मंदिर सार्थकी लागेल. केवळ ते शिकण्यासाठीच आपण तेथे जात असतो. जेथे महापुरुषाने सत्य कसे प्राप्त केले हे सांगितले जात नाही तिथे जाण्याने आपल्याला फायद्याऐवजी नुकसानच होईल. केवळ चरणामृत वाटणारी मंदिरे आम्हाला लाभ देण्याऐवजी आम्हाला क्षती पोहचवणारी आहेत. भगवान शंकराच्या चरणाश्रयी जो गेला त्याला त्यांनी श्रीरामचरणी सोपवले. स्वयं शंकर सतत श्रीरामाचा जप करीत होते.

**तुम पुनि राम राम दिन राति। सादर जपहु अनग अराती।।**
**काशी मरत जन्तु अवलोकी। जासु नाम बल करउँ विसोकी।।**

काशीमध्ये भगवान शंकर आपल्या पराक्रमाने भक्ताला मुक्ती देत नाहीत; परंतु नामाच्या बळावरच ते मोक्ष प्रदान करीत असतात. भगवान शंकरानी एकाच परमात्म्याच्या चिंतनावर भर दिला आहे.

अशाच प्रकारे हनुमान एक सच्चे सेवक व संत होते. तेही श्रीरामाचाच जप करायचे **''सुमि रि पवनसुत पावन नामू। अपने वश करि राखे रामू।।''** पवनसुत हनुमानाने त्या परम पावन रामनामाचा जप केला होता. त्यांनी हनुमान-हनुमान असा जप करायला कधीही सांगितले नाही. त्यांना जे जे अधिकारी भक्त मिळाले त्यांना त्यांनी रामचरणीच नेले.

**हनुमान सम नहिं बडभागी। नहिं कोउ राम चरन अनुरागी।।**

हनुमानाप्रमाणे भाग्यशाली कोणीही नव्हते. तर मग भाग्याचा स्त्रोत काय आहे? ''नहिं कोउ राम चरन अनुरागी'' रामचरणांचा अनुराग हाच भाग्याचा स्त्रोत आहे- जन्मदाता आहे.

या दोन्ही महापुरुषांच्या कथनावरून हे स्पष्ट होते की देवतांच्यामध्ये काही महापुरुषही आहेत जे आमचे पूर्वज आहेत. परंतु लाखो लाखो देवतांमध्ये त्यांची संख्या एक टक्काही नाही. परंतु त्यांच्याविषयी आमच्या मनात श्रध्दा असली पाहिजे कारण त्यांनी उग्र साधना करून परमात्म स्वरूपाची प्राप्ती करून घेतली होती. त्यांच्या पिढीसाठी ते सद्गुरू होते. परंतु आज त्यांची पूजा किंवा नाम-जप करायचे कारण नाही. परंतु तरीही श्रध्देने कोणी या महापुरुषाची पूजा केली किंवा नाम-जप केला तर ते महापुरुष त्या व्यक्तीला परमात्म्याकडे किंवा तिच्या समकालीन असणाऱ्या सद्गुरुकडे वळवतात. तेव्हा तुम्ही प्रथम पासूनच एका परमात्म्याच्या ठिकाणी श्रध्दा स्थिर करा. यामुळे तुमचा वेळ वाया जाणार नाही आणि तुम्हांला सतत त्याच्यापासून प्रेरणा प्राप्त होईल.

## (द)

गोस्वामी तुलसीदास यांनी रामचरित मानसाची रचना केल्यानंतर शेवटी त्याच्या विरुध्द अशा मानसरोगाबद्दलही त्यांनी सांगितले आहे. ''मोह सकल व्याधिन्ह कर मूला''- सर्व व्याधींचे मूळ म्हणजे मोह होय. काम म्हणजे वात आहे, कफ हा लोभ आहे व क्रोध म्हणजे पित्त आहे. काम, क्रोध व लोभ ही तीन भावंड जेव्हा एका ठिकाणी एकत्र होतात तेव्हा तिन्ही दोषांचा शरीरात प्रकोप होतो व मनुष्य त्रासून जातो. ''अहंकार अति दुखद डमरूआ तृष्णा उदर वृद्धि अति भारी।'' या प्रकारे तुलसीदासांनी पंधरा-वीस रोगांचे चित्रण करून शेवटी त्यांनी सांगितले- ''मानस रोग कछुक मै गाये''

मी येथे थोड्याच मानसरोगांचे वर्णन केले आहे. ''है सबके लखि विरलन्ह पाये।'' हे रोग सर्वांच्या शरीरात आहेत पण फार थोडे लोक त्यांना ओळखतात. मग या रोगांपासून कशी मुक्ती मिळेल? यावर ते म्हणतात-

**सदगुरु बैद बचन विश्वासा। संयम यह न विषय कै आशा।।**
**रघुपति भगति संजीवनि मूरी । अनुपान श्रध्दा मति पूरी।।**
**एहि विधि भलेही सो रोग नसाहीं। नाहिं त कोटि जतन नहिं जाहीं।।**

तुलसीदास म्हणतात की, सद्‌गुरू हेच उत्तम वैद्य आहेत. त्यांच्या वचनावर पूर्ण श्रध्दा ठेवावी. भगवंताची भक्ती (म्हणजे देवी-देवतांची भक्ती नाही तर केवळ भगवंताची भक्ती) हीच यावर संजीवनीप्रमाणे आहे. अनुपानासाठी सद्‌गुरूवर दृढ श्रध्दा ठेवली तरच रोग नष्ट होतील अन्यथा लाखो उपाय केल्यानंतरही ते दूर होणार नाहीत. मग आपण ते अन्य उपाय का करतो? मानसरोग नष्ट करणाऱ्या त्या प्रभूची भक्ती तुम्ही का करीत नाही?

## (ध)

आतापर्यंत तुम्हांला समजले असेल की तुमचा इष्टदेव कोण आहे? जो आम्हांला अनिष्ट गोष्टींपासून वाचवतो. त्याला इष्टदेव म्हणतात. आणि क्षती व आपले नुकसान करणाऱ्या गोष्टीला अनिष्ट असे म्हणतात. दैनंदिन जीवनात मनुष्याला नेहमी लहान-मोठी हानी सोसावीच लागते. कोणाचे डोके दुखते, कोणाच्या नोकरीत अडचण निर्माण होते, कधी वाहन बंद पडते, कधी अपघात होतो अशा प्रकारच्या अडचणी मनुष्याच्या जीवनात सतत येत असतात. तसेच मनुष्याच्या मनात अनेक प्रकारच्या इच्छा असतात. तेव्हा जो मनुष्याचे अनिष्टापासून रक्षण करतो आणि त्याच्या इच्छांची पूर्ती करतो तो इष्टदेव!

पण सर्व काही सुरक्षित झाल्यानंतर व समृध्द जीवन प्राप्त झाल्यानंतरही त्याचा उपभोग किती घेणार? अहो, हे शरीर तर क्षणभंगुर आहे. ते आज आहे तर उद्या नाही. त्या शरीराचा काही भरोसा नाही. ते नश्वर आहे. योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात की अर्जुना, अरे, हे शरीर नश्वर आहे फक्त त्या शरीरातील आत्मा शाश्वत आहे. ''अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम। (गीता ९/३३)''. म्हणजे प्राप्त झालेले वैभव विलास हे सर्व आम्हांला येथेच ठेवून जावे लागणार आहे. हा काळ आम्हांला केव्हाही ओढत-फरफटत घेऊन जाईल. मग या जन्म-मृत्यूच्या पलीकडे जाण्यासाठी काही उपाय आहे का? या भयंकर अनिष्टापासून आम्हांला वाचवून शाश्वत स्वरूप प्राप्त करून देणारे या

जगात कोणी आहे का? आम्हांला शाश्वत धाम प्रदान करणारे, अक्षय शांती देणारे कोणी आहे का? हो हे सर्व देणारा एकमात्र परमात्मा आहे- एकमात्र परमतत्त्व शाश्वत परब्रह्म त्याचे नाव आहे श्रीराम! त्याचा जप करा. तेच इष्ट आहे.

**(न)**

एकदा भगवान श्रीरामांनी सभा बोलावली-

**एक बार रघुनाथ बोलाए। गुरु द्विज पुरवासी सब आये।।**
**बैठे गुरु मुनि अरु द्विज सज्जन। बोले वचन भक्त भव भंजन।।**

गुरू-मुनी-द्विज-सज्जन सर्व बसले होते, तेव्हा भक्तांचे जन्म-मरणाचे दु:ख दूर करणारे राम म्हणाले-

**बडे भाग्य मानुष तन पावा। सुर दुर्लभ सदग्रन्थन्ह गावा।।**
**साधन धाम मोक्ष कर द्वारा। पाइ न जेहिं परलोक सँवारा।।**

अत्यंत पुण्याईने हे मनुष्यशरीर प्राप्त झाले आहे. ते देवतांनासुध्दा दुर्लभ आहे. उत्तम आचरणाचे फलस्वरूप म्हणून देवता भोग भोगत असतात; परंतु स्वर्गसुखही क्षणिक असते. त्यामुळे देवतादेखील मानवशरीराची अपेक्षा करतात. कारण हे शरीर साधनेचे धाम आहे, मुक्तीचे द्वार आहे. हे मानवशरीर प्राप्त केल्यानंतर जे आपला परलोक सुधारत नाहीत ते जन्मजन्मांतरीचे दु:खी होतात. त्यांना पश्चाताप होतो. काल-कर्म आणि ईश्वरास ते उगाचच दोष देतात. वास्तविक तुम्हांला मनुष्यशरीर प्राप्त झालेले असताना परलोक प्राप्त करण्याचा जर तुम्हांला उद्योग करता आला नाही तर दोष ना काळाचा असतो, ना कर्माचा ना ईश्वराचा असतो. सर्व दोष त्या व्यक्तीचाच असतो.

साधारणत: मनुष्य स्वत:ला दोषी समजत नाही. तो म्हणतो की माझ्या तर कर्मातच (नशिबात) हे लिहिलेले नाही तर कोठून मिळणार? म्हणजे येथे तो कर्माला दोष देतो. सध्या मला वेळ अनुकूल नाही, असे म्हणून काळाला दोष देतो आणि सर्व कर्ता-करविता ईश्वरच आहे असे म्हणून तो ईश्वराला दोष देतो. परंतु स्वत: भगवान रामचंद्रानी सांगितले आहे की जर मनुष्य शरीर प्राप्त झाले आहे तर त्यात दुसऱ्या कोणाचाही दोष नाही दोष असेल तर तो आपलाच आहे श्रीराम अन्यत्र म्हणतात.

**नर तन भव वारिधि कहँ बेरो। मनसुख मरूत अनुग्रह मेरो।**
**करनधार सद्‌गुरू दृढ नावा। दुर्लभ साज सुलभ करि पावा।।**

**जो न तरै भवसागर, नर समाज अस पाइ।**
**सो कृत निंदक मंदमति, आत्माहन गति जाइ॥**

हे मानवशरीर म्हणजे संसार सागर पार करणारी नाव आहे. सद्गुरू त्या नावेचा नाविक आहे. माझी कृपा म्हणजे अनुकूल वायू आहे. अशा प्रकारचा दुर्लभ संयोग व व्यवस्था असताना जो भवसागर पार करू शकत नाही तो स्वत:च आपल्या पौरुषाचा निंदक आहे. तो मंद बुध्दीचा आहे व आपल्या आत्म्याची हत्त्या करणारा आहे.

पण भवपार होण्याचा उपाय काय आहे?

**जो परलोक इहाँ सुख चहुहूँ। सूनि मम वचन हृदय दृढ गहहूँ।**
**सुलभ सुखद मारग यहु भाई। भक्ति मोर पुरान श्रुति गाई॥**

जर आपल्याला परलोक पाहिजे असेल, परमश्रेय असे शाश्वत धाम तुम्हांला पाहिजे असेल, अमृततत्त्व प्राप्त करू इच्छित असाल अथवा या लोकात आपल्या सर्व कामना पूर्ण करू इच्छित असाल तर मी केलेला उपदेश ऐका आणि अत्यंत दृढतेने त्याचे आचरण करा. भगवंताच्या कोणत्या उपदेशाचे आचरण करावयाचे? फक्त एकच गोष्ट करावयाची आहे. ती म्हणजे 'भगति मोरि' माझी भक्ती करा. एखाद्या नागाची किंवा देवतेची भक्ती करू नका. माझीच भक्ती करा. हेच श्रुतीनीही सांगितलेले आहे. तेव्हा इष्ट कोण आहे? एक परमतत्त्व परमात्मा। (या परमात्म्याशिवाय आम्हाला अनिष्ट गोष्टींपासून वाचवणारे दुसरे कोणीही नाही. आम्ही त्या भगवंताला मानत नसल्यामुळेच आम्हांला दारिद्र्य प्राप्त होत असते.)

रामाचे नाव घेताच साधारणत: सर्वजण दचकतात. त्यांना वाटते कोण राम? मानसकार तुलसीदासांनी श्रीरामाचा परिचय दिला आहे- ''राम ब्रह्म व्यापक अविनाशी'' जो व्यापक आहे, चिन्मय आहे, कणाकणात भरून राहिलेला आहे, जो अविनाशी आहे त्याचेच दुसरे नाव राम आहे. इष्ट कोण आहे? एक परमतत्त्व परमात्मा म्हणजे इष्ट होय. यावर संपूर्ण भरवसा ठेवून किंवा श्रध्दा ठेवून आपल्या कार्यात जो मग्न असतो त्याच्या घरात समृध्दीचा वास असतो. त्याला सुखी व दीर्घ आयुष्य प्राप्त होते. त्याला स्नायूंचे रोग होत नाहीत. तो तणावमुक्त जीवन जगू शकतो. आपण मग अगदी संसारात गुरफटलेला असलात तरी परलोकातील आपले स्थान सुरक्षित आहे असे समजावे. योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात- अर्जुना, परमेश्वरावर नितांत श्रध्दा ठेवून जो निष्काम कर्म करतो त्या पुरुषाचा कधी विनाश होत नाही. या मार्गामध्ये आरंभाचा कधी नाश होत

नाही. आपण जर अतीव श्रध्देने बीजारोपण केलेत तर ती श्रध्दा तुम्हांला परमश्रेयापर्यंत नेऊन पोहचवते. तुमच्या कामना तुमच्या अडचणी निर्माण करतात; पण सत्याच्या अनुष्ठानाला त्या नष्ट करू  शकत नाहीत. तेव्हा मानसकार म्हणतात की परमतत्त्व परमात्मा हाच इष्टदेव आहे.

देवी-देवता म्हणजे भ्रांती. मानसकारांनी अशा देवी-देवतांची पूजा करावयास कोठेही सांगितलेली नाही वा अशा देवदेवतांना पूजून कोठेही व कोणालाही यश प्राप्त झालेले नाही. पण दुर्दैवाने अशी पूजा आम्हांला वारसा हक्काने मिळत असते आणि आम्ही त्याचा डांगोरा पिटत असतो. पण त्याहीपेक्षा दु:ख याचे वाटते की या वारशाने प्राप्त झालेल्या या पूजेचा डांगोरा विरक्त महात्मादेखील पिटत असतात. रामकृष्ण परमहंस कालीमातेची पूजा करीत होते पण ती पूजा त्यांनी आपला अनन्य शिष्य विवेकानंद याला शिकवली नाही. विवेकानंदांच्या उपदेशात आपणास कधी देवीचे नाव देखील ऐकायला मिळत नाही.

अयोध्यावासी जनांचा असाच गैरसमज ते चित्रकूटला श्रीरामांना परत आणायला गेले तेव्हा झाला. कारण ते चित्रकूटवर गेले तेव्हा श्रीराम ''गनप गौरी त्रिपुरारी''ची पूजा करीत होते. परंतु श्रीरामाचा राज्याभिषेक झाल्यावर ते आपल्या मुलांना शिकवतांना म्हणतात-''भनहु प्रणत प्रतिपालक रामहि''- प्रतिज्ञेचे पालन करणाऱ्या श्रीरामाला तुम्ही भजा. ज्याप्रमाणे पापण्या डोळ्यातील बुबुळांचे रक्षण करतात त्याप्रमाणे तुमचे रक्षण करणाऱ्या त्या श्रीरामाला तुम्ही भजा. त्यांच्याकडून देवतांच्या पूजनाचा प्रश्नच येत नाही.

याप्रमाणे तुम्हांला आढळून येईल की, गीतेच्या शब्दांनी श्रीरामचरित मानसाची गोस्वामी तुलसीदासांनी सुरुवात केली आणि शेवटपर्यंत क्रमाक्रमाने एका परमात्म्यावर भर देऊन उत्तरार्धात शेवटी त्यांनी सांगितले आहे की- **''सोई कवि कोविद सोइ रणधीरा। जो छल छाडि भजई रघुवीरा।''** ज्याचे मन रामाच्या चरणी अनुरक्त आहे तोच कवी आहे, पंडित आहे, तोच रणधीर आहे. तोच कुलधर्म परायण आहे, तोच नीतिनिपुण आणि अत्यंत शहाणा आहे. तोच अत्यंत दक्ष व समस्त गुणांनी युक्त आहे. वेद उत्तमप्रकारे जाणतो.

असे असनूही लोक श्रीरामाचे भजन का करीत नाहीत ते समजत नाही. प्रवचन करणारे लोक कथा रामाची सांगतात परंतु भजनाच्या वेळी मात्र हनुमान चाळीसा म्हणतात, सप्तशतीचा पाठ करतात. कमीत कमी त्यांनी रामायणाचा संदेश लक्षात घेऊन आचरण केले पाहिजे. अजूनपर्यंत त्यांनी तसे आचरण केले नसले तर आता तरी त्यांनी रामायणाचा संदेश लक्षात घ्यावा आणि लोकांनाही समजून देण्याचा प्रयत्न करावा.

रामचरित मानसाच्या अंतिम पंक्तीपर्यंत गोस्वामी आपल्याला आग्रहपूर्वक सांगत आहेत की रामाशिवाय अन्य कोणाचीही भक्ती किंवा भजन तुम्ही करू नका- **''परामहि सुमिरिय गाइय रामहि। संतत सुनिय राम गुण ग्रामहि।''** रामाचेच स्मरण करा, रामाचेच भजन करा आणि त्यांच्याच गुणांचे श्रवण करा.

**सुंदर सुजान कृपा निधान अनाथ पर कर प्रीति जो।**
**सो एक राम अकाम हित निर्वानप्रद प्रभु आन को॥**

सुंदर, सुजाण, कृपानिधान आणि अनाथांवर प्रेम करणारा एकमात्र राम आहे. त्यांच्यासारखा तुमचे नि:स्वार्थपणे हित करणारा आणि मोक्ष देणारा दुसरा कोण आहे?

स्वयंसिद्ध अशा एका इष्टदेवाच्या स्थानी अनेक इष्टदेव निर्माण करून आज आम्ही सर्वत्र विखुरले गेले आहोत. तेव्हा लक्षात ठेवा की, शाश्वत असा एकमात्र सर्वव्याप्त परम ईश्वर परमात्मा आहे व म्हणून संपूर्ण विश्वाचा इष्टदेव असा एकमात्र परमात्माच आहे. आमच्यापैकी जे नश्वराची पूजा करतात ते नास्तिक आहेत असे समजावे. जे नश्वर आहे अस्तित्वहीन आहे त्यांची पूजा करणे, करवणे किंवा तिला प्रोत्साहन देणे म्हणजे नास्तिकतेला पोसणे होय किंवा प्रोत्साहन देणे होय. ब्रह्मदेवापासून यच्चयावत् या परिवर्तनशील जगामध्ये अविनाशी व अमृतस्वरूप परमात्मा भरलेला आहे. म्हणूनच संपूर्ण जगताचा तो अमृतस्वरूप परमात्माच इष्टदेव आहे. त्याची आवश्यकता समाजात सदैव आहे व सर्वांना आहे. तेव्हा सर्व व्यवहार करीत असताना परमतत्त्व परमात्म्याचे दोन-अडीच अक्षराचे नाव ॐ किंवा राम याचा जप केला तर आम्ही आस्तिक आहोत कारण आम्ही अस्तित्वाची पूजा करीत असतो. त्या परमात्म्याच्या भजनाची सुरुवात त्याच्यावर असीम श्रध्देने व त्याच्या नामजपाने होत असते. हो, पण अमृतस्वरूप परमात्म्याची प्राप्ती सद्गुरूमुळे होत असते. कारण सद्गुरूला ही क्रिया अनुभवगम्य असते व सूक्ष्म असते.

या सृष्टीमध्ये भगवंत एकच आहे. दोन किंवा अनेक असू शकत नाहीत. तो कणाकणामध्ये भरलेला आहे. जर दुसरा भगवंत असेल तर सर्वत्र व्यापून राहण्यासाठी त्याला दुसरे जग किंवा सृष्टी हवी. पण हा भगवंत राहतो कुठे? **''अस प्रभु हृदय अक्षत अविकारी। सकल जीव जग दीन दुखारी॥''** भगवंताचा निवास सर्वांच्या हृदयात असतो; परंतु तो कोणाला दिसत नाही. आता त्याला पाहावे कसे? त्याचा विधी असा- **''नाम निरुपण नाम जतन ते। सो प्रगटन जिमि मोल रतन ते॥''** प्रथम नामाचे निरुपण करा म्हणजे ते कशा प्रकारचे आहे त्याचा शोध घ्या. त्याचा जप कसा केला जातो? श्वासात उठणारी धून कशी पकडली जाते? त्याला

प्रेरणा देणारा कोण आहे? खूप प्रयत्न करून त्याला जाणून घेण्याचा प्रयत्न करा; म्हणजे तो प्रगट होईल.

तो परमात्मा म्हणजे एक धाम आहे. आणि त्यात प्रवेश करून देणारा म्हणजे माध्यम आहे सद्गुरू! ''गुरु राखई जो कोप विधाता! 'गुरु रुठे नहीं कोउ जग त्राता।'' जरी तुमचे नशीब तुम्हांला साथ देत नसेल, अनंत यातना तुम्हांला सहन करायला लागतात तेव्हाही सद्गुरूच तुमचे रक्षण करीत असतो. पण सद्गुरूच उपलब्ध नसेल तर भगवंताला तुम्ही ओळखू शकणार नाही. भगवंत तुमच्या हृदयात वास करीत असतो पण जर सद्गुरु नसेल तर त्या भगवंताला तुम्ही ओळखू शकत नाही. जो गुरु परपात्मप्राप्तीचा मार्ग दाखवीत नाही जो सत्यामध्ये प्रवेश देऊ शकत नाही, जो आमच्यातल्या सुप्त शक्तीला जागृत करीत नाही, एवढा जर तो सक्षम नसेल तर असा गुरू हा सद्गुरू नाही, कुलगुरू आहे. जोपर्यंत सद्गुरू उपलब्ध नसतात तेव्हा परमात्म्याचा परिचय करून देणारे दोन अडीच अक्षरांचे नाव आणि परमात्म्यावर असीम श्रध्दा जर तुमच्यात असेल तर तुमचा जप, भजन आणि इष्टदेव बरोबर आहे असे समजावे, या श्रध्देमुळे आपले मन एका परमेश्वराच्या ठिकाणी केंद्रित होते, एका ठिकाणी स्थिर होते व तेच मग तुमचे पुण्य बनते, तुमचा तो पुरुषार्थ ठरतो. याबरोबरच तुमचा आत्मा जागृत होऊन सद्गुरूबरोबर भेट घडवून आणेल आणि सद्गुरू भेटले की, आपल्या हृदयात यौगिक क्रियेची जागृती सुरू होईल. आणि आपल्याला निरनिराळे अनुभव येऊ लागतील, संकेत मिळतील व इष्टदेवाचे आदेश मिळणे पण सुरू होईल. तुमचा तटस्थ असणारा आत्मा जागृत होईल.

असे म्हटले जाते की, ईश्वर हृदयात वास करीत असतो. परंतु चार-सहा महिने एखाद्या तत्त्वदर्शी महापुरुषाची सेवा केली, त्यांनी सांगितलेली साधना केली की आमच्या हृदयातला देव जागृत होतो. तो मग तुमच्याशी बोलू लागतो, तुम्हांला मार्गदर्शन करू लागतो. तो ईश्वर तुम्हांला चालवतो. त्यांच्या निर्देशाप्रमाणे चालून साधक त्याला प्राप्त करतो. 'न अयम आत्मा प्रवचनेन लभ्य'' हा आत्मा ना प्रवचनाने प्राप्त होतो ना विशिष्ट बुध्दीने प्राप्त होतो ना पुष्कळ ऐकल्याने प्राप्त होतो. परंतु लाखो श्रध्दाशील लोकांमध्ये ज्याची तो निवड करतो त्याच्या हृदयात जागृत होऊन त्याचे बोट धरून त्याला चालवू लागतो. तोच श्रध्दाशील मनुष्य त्याच्या आदेशाप्रमाणे चालून त्या भगवंताला प्राप्त करून घेऊ शकतो. जेव्हा परमतत्त्व परमात्म्यावर अतुट श्रध्दा असेल आणि तत्त्वदर्शी सद्गुरू उपलब्ध असतात तेव्हाच तो भगवंत तुमचे बोट पकडेल.

॥ॐ॥

# Ir na_mË_Z Z_:

- **जन्त्र मन्त्र सब भरम है, भूत-प्रेत अरू देव ।**
  **अडगड सोचे गरू विना, कैसे पावे भेद ।।**
- **अडगड यहि संसार में, विष और अमृत दोय ।**
  **मूरख चाहत विषया विष, भक्त सुधामय होय ।।**
- **ब्रह्मचर्य :** मनाने विषयाचे चिंतन करण्याचे सोडून द्यावे व सतत परमात्याचे चिंतन करणे म्हणजेच ब्रह्मचर्याचे आचरण करणे होय, यामुळे केवळ जननेंद्रियचाच नव्हे तर सर्व इंद्रियांचा सहज संयम करता येतो.
- **भजन साधनेची योग्य पध्दत (विधी)**


  एकमेव असणाऱ्या परमात्म्यावर नितांत श्रध्दा व परमतत्त्व परमात्मयाचे नेहमीच्या सरावातील दोन किंवा अडीच अक्षरी नावाचा म्हणजे ॐ किंवा रामाचा जप तसेच आत्मदर्शी व तत्ववेता महापुरूषाचे (सद्‌गुरूचे) सान्निध्य, त्याची श्रध्देने सेवा करणे व सतत त्याचे व ईश्वराचे ध्यान करणे हीच खरी साधना होय - भक्तीचा विधी होय
- **सद्‌गुरू :** सद्‌गुरू हा संसार सागर पार करणाऱ्या सेतूप्रमाणे असतो. तो सर्व शास्त्रोक्त प्रणालीचा उद्‌गम आहे.

  तो समस्त पुण्यकर्मांचे करण व कारण (साधन व हेतु) आहे. तेव्हा अशा कल्याणाकारी शिवस्वरूप सद्‌गुरूंचे स्मरण करायला पाहिजे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यान करायला शिकलो पाहिजे.
- जगात सर्वात मोठ्या भक्ताचे हित-कल्याण चिंतणारा फक्त तत्वदर्शी सद्‌गुरूच असतो. दुसरा कोणीही नसतो. त्यांना समर्पित होऊन त्यांच्या कृपाछत्राखाली राहणाऱ्या भक्ताचा केसही ते वाकडा होऊ देत नाहीत.
- **धर्म :** धार्मिक कर्मकांड सोडून जो पूर्णपणे मला शरण येतो म्हणजेच ईश्वरच्या प्रती पूर्ण समर्पित होतो तोच खरा धर्म आहे त्या परमात्म्याला प्राप्त करण्याचा खरा मार्ग म्हणजे नियत विधीचे आचरण करणे हेच धर्माचारण आहे आणि जो त्याप्रमाणे आचरण करतो तो अत्यंत पापी असला तरी धर्मात्मा बनू शकतो.
- विधाता आणि त्याच्यापासून निर्माण झालोली सृष्टी नश्वर आहे. ब्रह्मा आणि त्याचापासून निर्माण झालोली सृष्टी, देवता व दानव हे सर्व दुःखांची खाण असून ते सर्व क्षणभंगुर व नश्वर आहेत.
- **अनुभव गुरू की बात है, हृदय वसे दिन रात ।**
  **पलक - २ अरू स्वाँस मे विपुल भेद दर्शात् ।।**


- गीतेच्या मतानुसार पुनर्जन्मास  कारणीभूत होणारे कर्मच पापाचे कारण आहे. आणि जो नियत आचरण करून परमात्म्याची सेवा करतो त्याच आचरणास पुण्य कर्म असे म्हणतात. तत्वस्थित सद्‌गुरूरूमध्ये असणारी श्रध्दा त्या परमात्म्याला जाणण्याचे साधन आहे
- **गुरू कोणाला म्हणावे ?** जो नेहमी कल्याणकारक-हितकारक उपदेश करतो तो.
- **मानव शरीराची सार्थकता :** सुखरहित, क्षणभंगुर परंतु दुर्लभ मानव शरीर मिळाले आहे तेव्हा तू माझे भजन कर. अर्थात भजनाचा अधिकार जगातीला यच्चयावत मानवाला आहे.
- **ईश्वराचा निवास :** तो सर्व समर्थ सर्वत्र असणारा परमात्मा मानवाच्या हृदयात निवास करून आहे. तेव्हा संपूर्ण श्रध्दाशीला भावांनी त्याला शरण जावे. त्यामुळे शाश्वत धाम, सदैव मिळणारी परम शांती प्राप्त होते.
- **विप्र - एक स्थिती :** क्रियात्मक मार्गावर वाटचाल करून अनुभूती मिळवणारे ब्राह्मण (विप्र) आहे. ती क्रिया म्हणजे केवळ परमात्म्यावर परम निष्ठा!
- **भगवत्पथावर बीजाचा नाश होत नाही :** त्या आत्मदर्शनाच्या क्रियेचे आचरणदेखील जन्ममरणाच्या महान भयापासून मुक्त करणारे आहे.
- जो सद्‌गुरूवर नितांत श्रध्दा ठेवतो आणि परमात्म्याच्या परिचायक अशा ॐ अथवा रामजपाचे सतत स्मरण करतो, तो क्रिया किंवा नियत आचरण म्हणजे काय ते जाणत नसला तरी तो क्रियावान आहे.
- हल्ली दोन-दोन पैशाला वेदान्त विकला जात आहे हे सर्वांना माहित आहे; परंतु साधना कधी लिहीली जात नाही. एखाद्या अनुभवी महापुरूषाद्वारेच अधिकारी साधकाच्या हृदयात ती जागृत केली जाते.
- सत्य वस्तूचा तिन्ही काळात अभाव नाही आणि असत्य वस्तूला अस्तित्वच नसते. आत्माच तिन्ही काळात सत्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे.
- सद्‌गुरूसारखा प्रेमळ, हितचिंतक व कृपाळू जगात दुसरा कोणीही नाही. परमेश्वराच्या निरपेक्ष कृपेनेच सद्‌गुरूचे दर्शन साधकाला होत असते.
- गुरूच्या वचनावर अश्रध्दा हेच तर कलियुगाचे लक्षण होय.
- **ईश्वराला पाहता येणे शक्य आहे.:** अनन्य भक्तीच्या द्वारे मी ईश्वराला प्रत्यक्ष पाहू शकतो, जाणू शकतो किंवा त्याचा ठिकाणी प्रवेश करू शकतो.
- जगामध्ये प्रचलित असणाऱ्या आद्य विचारांचे उद्‌गम स्थळ असणाऱ्या भारतातील समस्त अध्यात्मातील आणि आत्मस्थिती प्राप्त करून देणाऱ्या संपूर्ण शोधाच्या साधनाक्रमाचे स्पष्ट वर्णन गीतेमध्ये आहे. ज्यात ईश्वर एक असून त्याला प्राप्त करण्याचे क्रिया एक आहे त्याचा परिणाम म्हणजे फळ एक आहे व ते आहे प्रभूचे दर्शन आणि भगवतस्वरूपाची प्राप्ती आणि काळाच्या पलिकडे असणारे अतीत अनंत जीवन!

- गीतेच्या एकेश्वरवादाचा जगातील विविध भाषांत मूसा, येशू ख्रिस्त तसेच सूफी संतांनी प्रसार केला. भाषांतर असल्यामुळे वेगळे म्हणजे पृथक असल्याचे जाणवते; पण मूळ सिध्दांत गीतेतीलच आहेत आणि म्हणून गीता मानवाचे अतर्क्य असे धर्मशास्त्र आहे.
- श्रीकृष्णाच्या मते महापुरूषच कर्माचे माध्यम आहे. केवळ पुस्तक नव्हे. पुस्तक हा केवळ उपाय आहे. नुसता उपाय समजल्याने रोग जात नाही उपायाचा अंमला करावा लागतो.
- गीतेच्या मते प्राप्त करण्यास एकच देव आहे. आत्म्याच सत्य आहे. आत्म्याशिवाय काहीही शाश्वत नाही. त्या महान योगेश्वरने सांगितले, अर्जुना! ओऽम अक्षय परमात्म्याचे नाव आहे. त्याचा जपकर व ध्यान माझे धर. एकच कर्म करा गीतेमध्ये वर्णन केलेल्या परमदेवाची – एका परमात्म्याची सेवा! त्याला श्रध्देने आपल्या हृदयात धारण करा.
- भगवान श्रीकृष्णाच्या हजार वर्षानंतर ज्या महापुरूषांनी एकमात्रा ईश्वर हेच सत्य सांगितले ते सर्व गीतेचेच संदेशवाहक आहेत. ईश्वराकडूनच लौकिक – पारलौकिक सुखाची इच्छा, ईश्वराला घाबरणे, अन्य कोणाला ईश्वर न मानणे हे अनेक महापुरूषांनी सांगितले; परंतु ईश्वरीय साधना करून ईश्वरापर्यंत अंतर कमी करून अनामय परमपद प्राप्त करावे हे केवळ गीतेतच सांगोपांग व क्रमबध्दपणे आहे.
- "**यर्थाथ गीता**'' हे गीतेवरील भाष्य अवश्य पाहा


# आमची प्रकाशने





**यथार्थ गीता–**
'यथार्थ गीते' मध्ये श्रीकृष्णांच्या वाणीचा आशय चांगल्या प्रकारे, जसाच्या तसा समजाविला आहे. ही एक कालजयी कृति आहे
२८ भाषांमध्ये





**अंग क्यों फडकते हैं और क्या कहते हैं?–**
मानवी शरीराच्या विभिन्न भागांमध्ये होणाऱ्या स्पंदनांचे कारण आणि त्याद्वारे मिळणाऱ्या संकेतांचे विश्लेषण केले गेले आहे की जे साधना करताना सहाय्यक ठरते.
४ भाषांमध्ये





**जीवनादर्श एवं आत्मनुभूति–**
पूज्य गुरु परमहंस स्वामी श्री परमानंदजी महारांजांचे जीवन चरित्र, त्यांचे अनुभव तसेच त्यांच्या उपदेशांचे संकलन केले आहे. साधकांसाठी हा अतिशय उपयुक्त ग्रंथ आहे.
४ भाषांमध्ये.




**अनाकलनीय प्रश्न**
वर्ण, मूर्तिपूजा, ध्यान, हठ, चक्र-भेदन आणि योग अशा विषयांचे स्पष्टीकरण करुन, भ्रमात असले-ल्या समाजाला मार्गदर्शन केले आहे.
३ भाषांमध्ये





**शंका समाधान–**
समाजामध्ये प्रचलित असलेल्या सर्व वाईट रिती, रुढि, आवडंबर आणि अंधविश्वास ह्याबद्दल असलेल्या शंकांचे निरसन केले आहे
५ भाषांमध्ये.



**एकलव्याचा अंगठा–**
शिक्षण देणारा गुरु आणि सद्गुरु मधील फरक सांगितला आहे. शिक्षक हा लोकजीवनाची कला शिकवितो तर सद्गुरु जीवनामध्ये समृद्धि बरोबरच परम श्रेयाची जागृति आणि त्या परमपदाची प्राप्ति करवितो ज्यामुळे मनुष्याचा जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ति मिळते.
३ भाषांमध्ये.




**भजन कोणाचे करावे?**
धर्माच्या नावावर गाय, पिंपळ, देवी-देवता, भूत-भवानी ह्यांची पूजा लोक करीत आहेत. प्रस्तुत पुस्तकात ह्या सर्व भ्रांतिंचे निवारण करुन स्पष्ट केले आहे की सनातन धर्म कोणता? इष्ट म्हणजे कोण? साधना कोणाची करावी व कशी करावी?
६भाषांमध्ये.




**षोडशोपचार पूजा पद्धति–**
ह्या पुस्तकामध्ये हे सांगितले गेले आहे की एका परमात्म्यावर श्रद्धा स्थिर ठेऊन, त्या एका परमात्म्याचे चिंतन करायला शिकविणे म्हणजेच कर्मकांड होय.
३ भाषांमध्ये.


# आमची प्रकाशने



**योगशास्त्रीय प्राणायाम–**

योगशास्त्रीय प्राणायाम मध्ये आपण सांगितले आहेत की यम, नियम आणि आसन साध्य होताच श्वास–प्रश्वासाचे शांत प्रवाहित होणे म्हणजेच प्राणायाम होय. प्राणायाम नावाची वेगळी अशी कोणती क्रिया नाही. ही योग–चिंतनाची एक अवस्था आहे. त्याचेच निरसन ह्या पुस्तकात केले गेले आहे.


**३ भाषांमध्ये.**




**बारहमासी –**

आपले पूज्य गुरु श्रीपरमानंदजी महाराजांना आकाशवाणीने प्राप्त झालेले भजन (ईश्वरीय गायन) बारहमासीचे संकलन तसेच त्याचे विवेचन केले आहे. ह्यामध्ये लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचा प्रवेशापासून ते पराकाष्ठेपर्यंतचा मार्ग दाखविला आहे.


**हिंदी भाषेमध्ये.**




**योगदर्शन– प्रत्यक्षानुभूत**

व्याख्या– महर्षि पतंजलि कृत ह्या पुस्तकात सांगितले गेले आहे की 'योग' प्रत्यक्ष दर्शन आहे, तो लिहिता किंवा सांगता येत नाही. क्रियात्मक होऊनच साधकाच्या लक्षात येते की जे काही महर्षिंनी लिहीले आहे त्याचा वास्तविक अर्थ काय आहे? साधनेस उपयोगी असे पुस्तक आहे.


**३ भाषांमध्ये.**




**ग्लोरिज ऑफ योग–**

हठ, चक्र, भेदन आणि योग, प्राणायाम, ध्यान ह्या बद्दल पूर्ण माहिती.


**इंग्रजी भाषेमध्ये.**



**प्रश्न समाज के उत्तर गीता से–**

ह्या पुस्तकामध्ये सामाजिक, आध्यात्मिक तसेच धार्मिक असे कोणतेही प्रश्न असतील, त्यांचे गीतेच्या दृष्टि कोनातून निरसन केले आहे.

**हिंदी भाषेमध्ये.**



**अहिंसे चे स्वरुप–**

अहिंसा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. मूळतः हा यौगिक, आंतरिक साधनेचा शब्द आहे. ह्या पुस्तकात आपल्याला दिसेल की आपल्या पूर्वीच्या महापुरुषांनी अहिंसेला कोणत्या संदर्भात घेतले.


**४ भाषांमध्ये.**

MP3 ऑडियो सिडिज



६ भाषांमध्ये

श्री स्वामीजींच्या मुखातून निःसृत अमृतवाणीचे संकलन व्हात्युम १ ते ६० पर्यंत




हिंदी भाषेमध्ये.




**श्री परमहंस स्वामी श्री अड़गड़ानन्द जी आश्रम ट्रस्ट**

५, आपोलो इस्टेट, मोगरा लेन, नगरदास रोडच्या समोर, अंधेरी पूर्व,
मुम्बई ४०००६९, भारत. दूरध्वनी : ९१-२२-२८२५ ५३००

ईमेल : contact@yatharthgeeta.com • वेबसाइट : www.yatharthgeeta.com